
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

वार्षिक वृत्त : सौर शके १९४०-४१

दि.१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९

# प्रशालेय

२०१८-१९



अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।

'ईशावास्योपनिषद्'

घडो ज्ञानाचा उद्‌बोध। भक्तिप्रेमाचा कल्लोळ।।

# ज्ञान प्रबोधिनी



## संशोधन

- विविध सामाजिक व आर्थिक स्तरांतील बुद्धिमत्तेच्या विविध पैलूंची निश्चिती व मापन
- प्रेरणा, प्रतिभा, गतिवाचन, निर्णयक्षमता तसेच सामाजिक जाणीव, गटकार्य व शालेय वातावरण यांवर संशोधन
- भारतीय प्राच्यविद्या संशोधन



## ग्रामविकास

- देशप्रश्न सोडविण्यासाठी चारित्र्य-संपन्न व सक्षम नेतृत्वाची जडणघडण
- स्त्री शक्ती प्रबोधन
- नदीचे खोरे हा घटक मानून ग्रामीण विकासाचे बहुविध उपक्रम



## शिक्षण

- अनौपचारिक शिक्षणाची समाजाभिमुख चळवळ
- गुरुकुल पद्धतीचे शहरात व ग्रामीण परिसरात प्रयोग
- 'मनुष्यघडणीचे शिक्षण' या स्वामी विवेकानंदांच्या संकल्पनेचा क्रमिक शिक्षणाला जोडलेला पथदर्शक प्रयोग



## आरोग्य

- रोगप्रतिबंधक उपायांची जाणीवजागृती
- क्रीडाकुल संकल्पनेद्वारा स्पर्धात्मक खेळांचा प्रसार
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व जिव्हाळ्याचे मानवी संबंध यांवर आधारित रुग्णालये, आयुर्वेद, योग, मानसोपचार इ. चा एकात्मिक वापर



## एकात्मता

- निवडक संस्कारविधींना कालोचित व सार्थ रूप देणाऱ्या पुस्तिकांचे प्रकाशन
- सर्व जातिधर्मांतील स्त्री-पुरुषांना पौरोहित्याचे प्रशिक्षण
- राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी विभिन्न विचारसरणींमध्ये पूल बांधण्याचे प्रयत्न.



**'समाज संस्थापनेसाठी नेतृत्व विकसन'**


मुख्य केंद्रे - पुणे, निगडी, सोलापूर   उपकेंद्रे - शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे, हराळी, शिरवळ
विस्तार केंद्रे - अंबाजोगाई, बोरीवली, डोंबिवली, सांगली.
मुख्य कार्यालय - ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००, २४२०७१२१
फॅक्स : २४४९१८०६, e-mail : prashala@jnanaprabodhini.org

वार्षिक वृत्त

# प्रशालेय

सौर शके १९४०-४१ : दि. १ एप्रिल २०१८ ते दि. ३० एप्रिल २०१९



अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते । 'ईशावास्योपनिषद्'

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला


५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

दूरभाष : (०२०) २४२०७०००/२४२०७१२१

**फॅक्स : (०२०) २४४९१८०६**

**संकेतस्थळ :** www.prashala.jnanaprabodhini.org

**Email - prashala@jnanaprabodhini.org**

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

## पदाधिकारी २०१८–१९

- अध्यक्ष – वा. रघुनाथ माशेलकर
- उपाध्यक्ष – डॉ. विजय केळकर व श्री. अण्णा हजारे
- कार्याध्यक्ष – श्री. शं.बा. तथा रवि पंडित
- संचालक – वा. गिरीश बापट
- कार्यवाह – श्री. वि. शं. तथा सुभाष देशपांडे
- सहकार्यवाह – श्री. विश्वनाथ गुर्जर
- शिक्षण उपकार्यवाह – प्रा. विवेक पोंक्षे

## सन्माननीय सदस्य

- वा.श्री.रघुनाथ माशेलकर – माजी महासंचालक, CSIR, नवी दिल्ली
- श्री. अण्णा हजारे – सामाजिक कार्यकर्ते
- श्रीमती अनु आगा – माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या
- वा. जयंत नारळीकर – माजी संचालक,आयुका, पुणे

## ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ सदस्य शके १९४०–१९४१ (इ.स. २०१८–१९)

### निर्वाचित सदस्य

- श्री. शं.बा. तथा रवि पंडित
- वा. गिरीश बापट
- श्री. वि.शं./ सुभाष देशपांडे
- श्री. विश्वनाथ गुर्जर
- प्रा. वा. ना. अभ्यंकर
- श्री. रामकुमार राठी
- श्री. मोहन गुजराथी
- वा. विवेक कुलकर्णी
- प्रा. विवेक पोंक्षे
- वा. सुधाताई कोठारी
- श्री. महेश आठवले
- श्री. मनोज देवळेकर
- प्रा. महेंद्र सेठिया
- वा. अनघाताई लवळेकर

### संचालक नियुक्त सदस्य

- सौ. सुवर्णा गोखले
- वा. मिलिंद नाईक
- श्री. आशुतोष बारमुख
- सौ. सविताताई कुलकर्णी
- श्री. प्रशांत दिवेकर

### प्रशालेतील पदाधिकारी शके १९४०–१९४१ (इ.स. २०१८–१९)

- प्राचार्य – वा. मिलिंद नाईक
- समन्वयक – प्रा.रागिणी नाईक (इ.९वी ते १०वी)
- युवक समन्वयक – प्रा. रागिणी नाईक
- युवती समन्वयक – प्रा. संस्कृती बापट
- सा. अध्ययन– प्रा. संस्कृती बापट
- गणित – प्रा. वर्षा पुराणिक
- अर्धवेळ अध्यापक समन्वयक – प्रा.शिल्पा पवार
- सहनिवास व दलसमन्वयक – प्रा.प्रवीण पायगुडे
- पर्यवेक्षिका – प्रा. मुकुलिका थत्ते
- समन्वयक – प्रा. अश्विनी जोशी (इ.५वी ते ८वी)
- शास्त्र – प्रा. मुकुलिका थत्ते
- भाषा – प्रा. अश्विनी जोशी

## पालक शिक्षक संघ (२०१८–१९)

- ५ वी मुली – माधुरी देशपांडे
- ५ वी मुले – अश्विनी करंदीकर
- ६ वी मुली – प्रफुल्ल कामठे
- ६ वी मुले – प्रशांत बनकर
- ७ वी मुली – विश्वास घावटे
- ७ वी मुले – गिरीश लेले
- ८ वी मुली – अर्चना खरे
- ८ वी मुले – प्रज्ञा रेडकर
- ९ वी मुली – धनश्री भिडे
- ९ वी मुले – संदीप भडकमकर
- १० वी मुली – केतकी करंदीकर
- १० वी मुली – ज्योती देशमुख

- **अध्यक्ष–** वा.मिलिंद नाईक
- **उपाध्यक्ष –** सौ.अनुराधा जोशी
- **सचिव –** प्रा.नेहा अभ्यंकर
- **सहसचिव –** श्री.गणेश डांगी

## शिक्षक प्रतिनिधी

- प्रा. मुकुलिका थत्ते
- प्रा. अश्विनी जोशी
- प्रा. रागिणी नाईक
- प्रा. प्रवीण पायगुडे

## वाहतूक समिती

- अध्यक्ष – वा. मिलिंद नाईक
- पालक प्रतिनिधी– श्री. राहुल कुलकर्णी, श्री. संजय शेडगे
- शिक्षक प्रतिनिधी – श्री. प्रवीण पायगुडे
- वाहतूक प्रतिनिधी – श्री. जितेंद्र सोनावणे

## संपादकीय

ज्ञान प्रबोधिनी - एक अभिनव प्रयोग ही उपाधी सार्थ करित वेगवेगळ्या उपक्रमांचा व कार्यक्रमांचा अंतर्भाव करीत सन २०१८-१९ हे वर्ष पार पडले. यावर्षी माननीय केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांनी प्रशालेस भेट देऊन येथील शैक्षणिक उपक्रम समजावून घेत त्याचे कौतुक केले व राष्ट्रीय स्तरावरती ज्ञान प्रबोधिनीच्या उपक्रमांची दखल घेतली गेली हा आनंदाचा भाग. यावर्षी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासाठी विविध डोमेन्सअंतर्गत बारकाईने विद्यार्थी-निरीक्षण करून त्याला प्रत्याभरण (feedback) देण्याची स्वत:ची अशी पद्धती बसवण्याचा एक चांगला प्रयत्न प्रशालेत झाला आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे जास्तीतजास्त वस्तुनिष्ठ चित्रण करण्यासाठी प्रशाला नियमित काम करते आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत घेतलेल्या कार्यशाळा, वेगळ्या पद्धतीने केलेली अध्यापक प्रशिक्षण योजना, पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रत्याभरणासाठी सुरू केलेला 'मुक्त संवाद दिन' इ. नव्या प्रयोगांची भर पडली. वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ प्रक्रियांचा वापर करून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व जास्तीतजास्त समृद्ध करण्याचा प्रशालेचा प्रयत्न असाच चालू राहील. या वृत्ताच्या निमित्ताने यावर्षीच्या कार्यक्रमांचा आढावा घेत आहोत. पुढील वर्ष प्रशालेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असणार आहे. आपणांसही या आनंदसोहळ्यात सहभागी होण्याचे मन:पूर्वक निमंत्रण!

**प्रा. रागिणी नाईक**
**समन्वयक (संपादिका)**

## भूमिका

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रज देश सोडून गेले पण इंग्रजांनी घालून दिलेली शिक्षणपद्धती आपण आजही तशीच चालवतो. इंग्रजांनी घालून दिलेल्या शिक्षणपद्धतीचे उद्दिष्टच मुळी केवळ त्यांनी चालवलेल्या उद्योगधंद्यांना कर्मचारी मिळवणे होते. त्या काळात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण होत होते आणि त्या औद्योगिकरणाच्या झपाट्यात उद्योगांना लागणारे कर्मचारी तयार करणे हेच शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट झाले होते. त्या काळात भारतात गरीबीही पुष्कळ होती आणि त्यामुळे भारतातील लोकांनी इंग्रजानी घालून दिलेली जेवणदायी शिक्षणपद्धती स्वीकारणे भाग होते. नोकरी करणे, पैसा मिळवणे, घरदार करणे याच्यापलिकडे जाऊन आयुष्याला काही वेगळे उद्दिष्ट असते याचा त्या काळात संपूर्ण विसर पडला होता. आणि ते स्वाभाविकही होते. पोट भरलेले नसताना अन्य काही उद्दिष्ट ठेवणे हे शक्यही नव्हते. परंतु आता भारतातील परिस्थिती वेगळी आहे. मोठ्या प्रमाणावरती सुधारणा झाल्या आहेत. लोकसंख्येचा एक मोठा भाग आता केवळ पोटासाठी शिक्षण घेत नाही. आणि म्हणून आता जीवनदायी शिक्षणाचा विचार केला पाहिजे.माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा या किमान गरजा भागल्यानंतर शारीरिक व मानसिक आरोग्य आणि मनोरंजन या गरजा पुढे येतात. अब्राहम मॅस्लो या मानसतज्ज्ञाने माणसाच्या गरजा व प्रेरणांचा मूलभूत अभ्यास केला. मॅस्लोच्या गरजांच्या पदसोपानाप्रमाणे प्रथम शारीरिक गरजा पूर्ण झाल्यानंतर, गरजांचे सुरक्षा विषयक गरजा, प्रेम व आपुलकी विषयक गरजा, आत्मसन्मान आणि स्वतःमधील अंतःशक्तीचा संपूर्ण आविष्कार असे पुढचे टप्पे आहेत. विवेकानंदांनीही शिक्षणाचे हेच उद्दिष्ट सांगितले आहे. शिक्षण म्हणजे माणसाच्या अंत:स्थ क्षमतांचे प्रकटीकरण अथवा अंतःशक्तीचा संपूर्ण आविष्कार होय. सध्याचे शिक्षण शिक्षणाच्या या मूलभूत संकल्पनेपासून खूप दूर आहे असे जाणवते.एकूणात शिक्षणाच्या जेवणदायी अंगाकडे भर दिला गेल्याने जीवनदायी शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले.

शिक्षणाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण म्हणजेच शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक विकास व्हायला हवा हे आता सर्वमान्य झाले आहे. मग ते शास्त्रज्ञ असोत, मेंदूतज्ज्ञ असोत अथवा शिक्षणतज्ज्ञ वा मानसतज्ज्ञ ! ज्ञान प्रबोधिनीची शिक्षण पद्धती मनुष्य घडणीचा विचार करताना जेवणदायी व जीवनदायी या दोन्ही गोष्टींचा एकत्र विचार करते.

**वा.मिलिंद नाईक**
**प्राचार्य**

# अनुक्रमणिका


* श्रद्धांजली

**१. शैक्षणिक प्रयोग**
- १.१. गतिमान प्रभुत्व अध्ययन-अध्यापन पद्धती
- १.२ विशेष उद्दिष्ट गट
- १.३ दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग
- १.४ प्रकल्प पद्धती
- १.५ गुणविकास योजना
- १.६ अभिव्यक्ती विकसन

**२. विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम**
- २.१ विद्याव्रतसंस्कार
- २.२ गणेशोत्सव
- २.३ बौद्धिक प्रगल्भता
  - १) विशेष व्याख्याने
  - २) विशेष वर्ग
- २.४ अभ्यासशिबिरे
- २.५ विशेष अभिरुची गट
- २.६ प्रकल्प शिबिर
- २.७ पुनर्भरण वर्ग

**३. सामाजिक जाणीव**
- ३.१ नागरी वस्ती उपक्रम
- ३.२ सहाध्याय दिन
- ३.३ आषाढी एकादशी- वारीतील सहभाग
- ३.४ राष्ट्रीय दिन- कार्यक्रम

**४. मानसिक समृद्धी**
- ४.१ संस्कार कार्यक्रम- विद्यारंभ, वर्षारंभ, वर्षांत उपासना
- ४.२ साप्ताहिक उपासना व चिंतन
- ४.३ आषाढी एकादशी- भजन गायन

**५. शारीरिक कौशल्ये**
- ५.१ दैनंदिन क्रीडादले
- ५.२ क्रीडाशिबिरे
- ५.३ गिरीभ्रमण सहली

**६. नेतृत्वगुण विकास**
- ६.१ अग्रणी प्रशिक्षण शिबिर
- ६.२ प्रार्थनेनंतरचे वक्तृत्व
- ६.३ गुरूपौर्णिमा व्याख्याने
- ६.४ अग्रणी तासिका

**७. प्रशिक्षण व बैठका**
- ७.१ अध्यापक प्रशिक्षण
- ७.२ अध्यापक बैठका
- ७.३ पालक बैठका
- ७.४ पालक-शिक्षक संघ बैठका


**८. यश**
- ८.१ शालान्त परीक्षा
- ८.२ बाह्यपरीक्षा
- ८.३ स्पर्धांतर्गत
- ८.४ उल्लेखनीय

**९. विशेष दखल**
- ९.१ केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री मा.प्रकाशजी जावडेकर भेट
- ९.२ संचालक भेट
- ९.३ अध्यापक अभ्यासदौरे
- ९.४ विविध गटांच्या प्रशाला भेटी
- ९.५ प्रासंगिक

**१० कृतज्ञता : देणगीदार हितचिंतक**

# श्रद्धांजली





शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०१९ रोजी ज्ञान प्रबोधिनीचे माजी प्राचार्य विवेकराव पोंक्षे यांचे कर्करोगाने वयाच्या अवघ्या ५८व्या वर्षी निधन झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा विकास व्हायचा असेल तर शिक्षणात नेमके कोणते बदल केले पाहिजेत याची जाण असणारा एक द्रष्टा कार्यकर्ता– शिक्षणतज्ज्ञ काळाच्या पडद्याआड गेला. भारताचा विकास खऱ्या अर्थाने व्हायचा असेल तर या देशातील लोकांना केवळ विज्ञानच नव्हे तर वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवण्याची गरज आहे हे त्यांनी ओळखले होते. धर्माचा लावलेला चुकीचा अर्थ व अंधश्रद्धा यात अडकलेल्या भारतीय मनाला तर्काधिष्ठित विचार करण्याची सवय लावून मुक्त केल्याशिवाय प्रगती होणार नाही याची त्यांना जाण होती आणि म्हणूनच स्वतः शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवूनसुद्धा उपयोजित विज्ञान शिकण्यापेक्षा शुद्ध विज्ञान शिकण्याचे ठरवले व उत्तम भौतिकशास्त्रज्ञ बनूनसुद्धा एखाद्या प्रयोगशाळेत प्रयोग करत वेगवेगळे शोध– निबंध लिहित बसण्यापेक्षा समाजाचा विज्ञान शिक्षक होण्याचे काम त्यांनी स्वीकारले.

एक विज्ञान शिक्षक म्हणून त्यांची विषय शिकवण्याची हातोटी काही औरच होती. त्यांची विषयावरची पकड इतकी मजबूत होती की विज्ञानाचे पुस्तक वर्गात नेण्याची त्यांना कधीच गरज पडली नाही. तत्त्वे, व्याख्या, सूत्रे अगदी तोंडपाठ होती. विविध शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली तत्त्वे नुसतीच समजलेली होती असे नाही तर त्यांच्या शोधांचा इतिहास तोंडपाठ होता. विवेकरावांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतलेले विज्ञानातील प्रकल्प राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांत गाजले व बक्षिसे मिळवून गेले. विद्यार्थ्यांना चांगले प्रकल्प करता यावेत याकरिता त्यांनी विज्ञान प्रयोगशाळा अतिशय सुसज्ज व आधुनिक केल्या होत्या. दहावीपर्यंतच्या शाळेत पदवीपर्यंतचे प्रयोग करता यायचे.

वैज्ञानिक दृष्टिकोन तयार व्हावा म्हणून विवेकरावांनी पुस्तके लिहून घेतली व लिहिली. विज्ञान प्रयोगांसाठीचे अनेक संच तयार केले. फिरत्या प्रयोगशाळांची निर्मिती केली.

केवळ शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागात देखील बुद्धिमत्ता असते हे जाणून त्यांनी ग्रामीण प्रज्ञा विकास योजनेला सुरुवात केली आणि त्याद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसनाला सुरुवात केली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी म्हणून 'छोटे सायंटिस्ट', 'ज्ञानसेतू', 'विवेक-इन्स्पायर' यासारखे प्रकल्प त्यांनी हाती घेतले. त्यातील 'छोटे सायंटिस्ट' व 'ज्ञानसेतू' यामध्ये शहरातील उत्साही तरुण विज्ञानातील प्रयोग यांचे प्रशिक्षण घेऊन ग्रामीण अथवा संवेदनशील भागात जाऊन विज्ञान प्रसाराचे काम करतात तर 'विवेक-इन्स्पायर'मध्ये अरुणाचल प्रदेश मधील विवेकानंद केंद्राच्या शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रकल्प कसे करावेत याचे प्रशिक्षण दिले जाते.

विवेकरावांनी शेकडो शासकीय व खासगी प्रशिक्षणांमधून हजारो अध्यापकांना विज्ञान कसे शिकवावे व वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून प्रकल्प कसे करावे याचे मार्गदर्शन केले. याशिवाय अनेक विज्ञान प्रसार करणाऱ्या संस्थांचे सदस्य अथवा संस्थाचालक होते. यामधील काही म्हणजे मराठी विज्ञान परिषद, राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, बाल विज्ञान चळवळ, विज्ञान अध्यापक मंडळ इत्यादी. त्यांनी अलिकडच्या काळात हाती घेतलेला प्रकल्प म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या पाठ्यपुस्तकातील क्यू आर कोड्सना चित्रफितींची जोड देणे होय. केन्द्र सरकारच्या दीक्षा पोर्टलमध्ये ज्ञानप्रबोधिनी एक भागीदार होणे याचे श्रेयही त्यांनाच जाते.



विवेकराव एकाच वेळी शंभर कामे करू शकत असत आणि म्हणूनच त्यांच्या कामाचे स्वरूप विविध प्रकारचे व व्यापक होते. हाडाचा शिक्षक, कुशल संघटक, उत्तम वक्ता, चिकित्सक संशोधक, निर्भीड कार्यकर्ता, सेवाव्रती अशी अनेक विशेषणे विवेकरावांना सहज लागू होतात. विवेकराव ज्ञानप्रबोधिनीच्या शिक्षण प्रभागाचे उपकार्यवाह होते, ज्ञानप्रबोधिनी सोलापूरचे कार्यवाह होते, शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे विभाग प्रमुख, 'प्र-शिक्षक'चे संपादक होते तर बाल विज्ञान चळवळीचे संस्थापक सदस्य, राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद पुण्याचे अध्यक्ष, नवोदय विद्यालय समितीचे सदस्य आणिक किती सांगावे? त्यांच्या व्यक्तिमत्व वर्णनाला शब्दांची मर्यादा पडते. अशा या ध्येयवेड्या, विज्ञाननिष्ठ , हाडाच्या अध्यापकाला प्रशालेतर्फे भावपूर्ण स्मरणांजली !

# १. शैक्षणिक प्रयोग

## १.१. गतिमान प्रभुत्व अध्ययन–अध्यापन पद्धती :

इ. ५वी ते ८वी साठी इंग्रजी व गणित या विषयांसाठी चालू केलेला हा प्रयोग याही वर्षी चालू आहे. आपापल्या गतीनुसार पुढचे पुढचे अध्ययन करीत वरच्या स्तरात जाण्याची संधी या अध्ययन–पद्धतीतून मिळत आहे आणि इंग्रजी व गणित या महत्त्वाच्या विषयांचे पायाभूत ज्ञान दृढ होण्यास मदत होत आहे. यावर्षी या स्तर पद्धतीच्या मूल्यमापन पद्धतीत थोडा बदल केला. किमान काही संकल्पना सगळ्यांना समजाव्या यासाठी उत्तीर्ण होण्याच्या गुणांमध्ये शिथिलता आणली.

## १.२ विशेष उद्दिष्ट गट :

देशप्रश्न सोडवणारे कार्यकर्ते घडायचे असतील तर त्यांना या प्रश्नांची जाण योग्य वयातच यायला हवी. त्यासाठी गेली आठ वर्षे इ. ९वी, १०वी साठी हा उपक्रम चालू आहे. एप्रिल महिन्यात प्रत्येक गटाच्या मार्गदर्शकांचे इ. ९वीसाठी प्रास्ताविक व्याख्यान झाले. यावर्षी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या प्रश्नगटातील विषयांत पुढील मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

| विषय | मार्गदर्शक |
|---|---|
| १) ऊर्जा | संतोष गोंधळेकर |
| २) अर्थशास्त्र | मेधाविनी वाटवे, वेदांगी पटवर्धन, अपूर्वा अभ्यंकर |
| ३) ग्रामविकसन | सुनिता गायकवाड, सुवर्णा गोखले |
| ४) लोकशाही शिक्षण | मृण्मयी परळीकर |
| ५) राष्ट्रीय एकात्मता | सनतकुमार भाटे, मकरंद सुपनेकर |
| ६) मानसशास्त्र | राधिका कुलकर्णी |
| ७) सामाजिक आरोग्य | निलांगी सरदेशपांडे |
| ८) पत्रकारिता | सुजाता देशमुख |

| विशेष उद्दिष्ट गट | उपक्रम |
|---|---|
| ऊर्जा | क्षेत्रभेट – पिरंगुट जैव इंधन निर्मिती केंद्र, हराळी – उर्जा अन्वेक्षण |
| लोकशाही शिक्षण | कार्यशाळा सहभाग – नीतिकुशल |
| सामाजिक आरोग्य | क्षेत्रभेट – ससून रुग्णालय |
| ग्रामविकसन | क्षेत्रभेट – वरोती – जलसंधारण काम |
| अर्थशास्त्र | क्षेत्रभेट – मॅप्रो फूड फॅक्टरी |

## १.३ दृक् – श्राव्य साधनांच्या साहाय्याने अध्यापन – अध्ययन

अध्यापनात दृक्–श्राव्य साधनांचा उपयोग वाढावा यासाठी यावर्षी अधिक प्रयत्न केले गेले. प्रकल्प, व्याख्यान, गटचर्चा, गटकार्य, सहाध्याय–दिन याबरोबरच संगणक, ध्वनिचित्रफिती, पीपीटी

शोज यासारख्या विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांनी  अध्ययनाचा आनंद घेतला. तसेच अध्यापकांनी गृहकार्ये, कार्यपत्रके, टिपणे इत्यादी तपशील इ-टेक या बेवसाइटद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोचविले.



## १.४  प्रकल्पातून अध्ययन :


पाठ्यपुस्तकातून माहिती घेत असतानाच स्वत: प्रयोग करून, गृहीतके मांडून, वाचन करून, संदर्भ पुस्तके धुंडाळून, प्रत्यक्ष दर्शन घेऊन त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याचा हमखास मार्ग म्हणजे प्रकल्प 'स्वत: करून बघणे' व 'शिकण्यास शिकणे' या दोन महत्त्वाच्या अध्ययन तंत्राचा वापर विद्यार्थी येथे करत असतात. प्रकल्पपद्धती ही ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीतील अविभाज्य भाग आहे. या वर्षी इ. ५वी ते इ.१०वी पर्यतच्या प्रकल्पांची काठिण्यपातळी व जटिलता क्रमाने वाढत जाईल अशी रचना पुढीलप्रमाणे केलेली होती.

| इयत्ता | प्रकल्प प्रकार | तपशील |
|---|---|---|
| इ. ५वी | संग्रहात्मक | वस्तूंचे संकलन/वर्गीकरण करणे |
| इ. ६वी | कात्रण संग्रह | माहितीचे संकलन/ विश्लेषण करणे |
| इ. ७वी | प्रतिकृती | वैज्ञानिक उपकरण बनवणे |
| इ. ८वी | अभिव्यक्ती | प्रतिभाशाली लेखन-स्वनिर्मिती |
| इ. ९वी | संशोधनात्मक | संशोधनाची शास्त्रीय पद्धत वापरून समस्या सोडवणे |
| इ. १०वी | भविष्यवेध | मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून पुढील काळाचे भाकित करणे |

इ. १०वी चे प्रकल्प विशेष उद्दिष्ट गटाशी जोडलेले होते. प्रकल्पाच्या माध्यमातून निरीक्षण, वर्गीकरण, समस्या परिहार, गटात काम करणे, कल्पक विचार, विविध प्रयोग करून पाहणे यासारखी विविध कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात केली. या सर्व प्रकल्पांचे प्रदर्शन दि. २ मार्च  रोजी भरवले होते. आयसरचे प्रा. डॉ. अरविंद नातू यांनी प्रदर्शनाचे उदघाटन केले व त्यांच्या हस्ते  उत्तम प्रकल्पांना पारितोषिके देण्यात आली यावेळी  डॉ. अरविंद नातू यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावर्षी प्रकल्पांचे बाह्यपरीक्षण पुढील मान्यवरांनी केले.

| इयत्ता | बाह्यपरीक्षक | इयत्ता | बाह्यपरीक्षक |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | डॉ. अजित वर्तक | इ. ६ वी | मा. दीपक बिडकर |
| इ. ७ वी | प्रा. परेश शिंदे | इ. ८वी | प्रा. लक्ष्मी गोखले (इंग्रजी), प्रा. भाग्यश्री हर्षे (मराठी) |
| इ. ९वी | प्रा.असीम आवटी, प्रा. कल्पेश कोठाळे | इ. १०वी | मार्गदर्शक - विशेष उद्दिष्ट गट |





## १.५ गुणविकास योजना :

यावर्षी डॉ. जे. पी. गिलफोर्ड यांनी मांडलेल्या प्रारूपावर इ. ७वीच्या गुणविकास योजनेचा अभ्यासक्रम आधारित होता. डॉ. गिलफोर्डच्या प्रारूपानुसार बुद्धीचे स्वरूप तीन बाजूंनी निश्चित होत असते. पहिली बाजू – विचाराचे माध्यम, दुसरी बाजू – विचाराची प्रक्रिया व तिसरी बाजू – विचाराची निष्पत्ती.

गुणविकास ह्या योजनेसाठी यापैकी पहिल्या दोन बाजूंचा विचार केलेला आहे. विचाराच्या माध्यमात दृश्य, श्राव्य, प्रतीकात्मक, आशयात्मक व वर्तनात्मक गोष्टींचा विचार केलेला आहे; तर विचारांच्या प्रक्रियेत आकलन, स्मरण, बहुदिश विचार, एकदिश विचार व मूल्यमापन ह्या प्रक्रियांचा अंतर्भाव आहे. पाच विचारांची माध्यमे व पाच विचारांच्या प्रक्रिया अशा (५५) २५ घटकांचा अंतर्भाव ह्या अभ्यासक्रमात करण्यात आला. त्यांपैकी यावर्षी दहा घटकांचे मूल्यमापन केले गेले. ते दहा घटक व उपक्रम पुढीलप्रमाणे होते.

| **बुद्धिमत्ता –** | **विचार व प्रक्रिया** | **विद्यार्थ्यांनी केलेले काम** |
|---|---|---|
| दृश्य | आकलन | मेकॅनो तयार करणे |
| दृश्य | स्मरण | स्मरणचित्र रेखाटणे |
| दृश्य | बहुदिश विचार | भौमितिक प्रतिकृती तयार करणे |
| दृश्य | एकदिश विचार | एका आकारातून अनेक आकार तयार करणे |
| दृश्य | मूल्यमापन | चित्रकलेच्या दृष्टिने चित्राचे परीक्षण करणे |
| श्राव्य | स्मरण | आधीच ऐकविलेले वाद्य व आवाज परत ऐकवणे व ओळखायला सांगणे |
| प्रतीकात्मक | आकलन | द्विमिती व त्रिमिती नकाशावाचन |
| प्रतीकात्मक | स्मरण | रस्ते वाहतुकीची संकेतचिन्हे ओळखणे |
| प्रतीकात्मक | एकदिश विचार | बोधचिन्ह तयार करणे |
| आशयात्मक | स्मरण | समानार्थी शब्द ओळखणे |
| आशयात्मक | बहुदश विचार | कथा पूर्ण करणे |
| आशयात्मक | मूल्यमापन | निर्णय कौशल्य |
| वर्तनात्मक | आकलन | प्रसंगाचे विश्लेषण करणे |
| वर्तनात्मक | स्मरण | प्रसंगातील व्यक्तिंच्या वर्तनाचे विश्लेषण करणे |
| वर्तनात्मक | एकदिश विचार | दैनंदिनी लेखन करणे |
| वर्तनात्मक | बहुदिश विचार | प्रसंगात स्वत:च्या वागणूकीचे विश्लेषण करणे |
| वर्तनात्मक | मूल्यमापन | मुलाखत घेणे. |

वरील दहाही उपक्रमांमध्ये विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना वर्गश: प्रथम पारितोषिक दिले जाते. तसेच सर्व एकत्रित १० उपक्रमांमधे उत्तम यश मिळविणाऱ्या ५ मुलांना व ५ मुलींना पुढील तीन वर्षांसाठी शिष्यवृत्ती दिली जाते. ह्या वर्षी पुढील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

| **क्रमांक** | **इ. ८वी मुले** | **इ. ८वी मुली** |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | अभिषेक गायकवाड | धनश्री बनसोडे |
| द्वितीय क्रमांक | मनन अग्रवाल | ईशानी आवळसकर |
| तृतीय क्रमांक | नीरज बापट | सई जोशी |


| | | |
|---|---|---|
| चतुर्थ क्रमांक | अथर्व निकम | वीरजा कामठे / रेवती हिंगणे |
| पाचवा क्रमांक | रणजीत देशमुख | वैष्णवी कामठे |

## १.६ अभिव्यक्ती विकसन :

इ. ५ वी ते १० वीसाठी वर्षभर अभिव्यक्ती विकसन तासिकांची योजना केलेली होती. त्यात नृत्य, नाट्य, गायन, वादन, चित्रकला, शिल्पकला, वक्तृत्व आणि प्रतिभाशाली लेखन या विषयांचा समावेश होता. इ. ५ वी, ६ वीच्या विद्यार्थ्यांनी या आठही विषयांची वर्षभरात ओळख करून घेतली तर इ. ७वी ते इ.१० वीच्या विद्यार्थ्यांनी त्यातील आपल्या आवडीचा विषय निवडून त्यातील विविध कौशल्ये शिकण्याचा व आत्मसात करण्याचा वर्षभर प्रयत्न केला.

**अभिव्यक्ती –सादरीकरण :**

आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठीचे अभिव्यक्ती हे महत्त्वाचे माध्यम मानले गेले आहे. त्यामुळेच यंदाच्या वर्षी यासाठी दि. ९ ते २१ एप्रिल या कालावधीत अभिव्यक्ती शिबिर घेतले. यात कार्यक्रमासाठीची तयारी व सराव घेतला गेला. दि. २५ एप्रिल रोजी मुलांचा व दि. २६ एप्रिल रोजी मुलींचा अभिव्यक्ती सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. मुलांकडे सुप्रसिद्ध तबला वादक व प्रशालेचे माजी विद्यार्थी श्री. अरविंद परांजपे व मुलींकडे सुप्रसिद्ध नृत्यांगना व प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी सौ.धनश्री पुणतांबेकर ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.









# २. विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम



## २.१ विद्याव्रत संस्कार (इ. ८वी साठी) :

इ. ८वीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी केला जाणारा हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्कार. याच्या अंतर्गत इ. ८वीच्या मुला-मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दिशा दाखविणारी एक व्याख्यानमाला एप्रिल २०१८ ते जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजित केली होती. त्यात पुढील मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

| विषय | वक्ते | सार |
|---|---|---|
| प्रास्ताविक | वा. मिलिंदराव नाईक | विद्याव्रत संकल्पनेची ओळख, आश्रम, कर्तव्ये, ऋण, आवश्यक व्रते यांची ओळख |
| शारीरिक विकसन | सौगंध देशमुख | शारीरिक विकसनाची विविध परिमाणे आणि त्यांची ओळख, क्रीडा आणि व्यायाम यांचे महत्त्व |
| | एकता जाधव | मनुष्य आणि प्राणी यामधील मूलभूत फरक हा कि मनुष्य विचारपूर्वक स्वत:मध्ये बदल करू शकतो. |
| आहारशास्त्र | वैद्य प्रयाग सेठिया | आयुर्वेदानुसार आदर्श आहार संकल्पना |
| व्यायामशास्त्र | वैद्य मंदार अक्कलकोटकर | आयुर्वेदानुसार व्यायाम संकल्पनेच्या संस्कृत मधील विविध व्याख्यांची ओळख. |
| मानसिक विकसन | वा. अनघाताई लवळेकर | मन आणि मनाचे पैलू |
| भावनिक विकसन | वा.प्रणिता जगताप | भावनाचे तटस्थपणे मापन |
| भावनिक विकसन | वैद्य दीपक गुप्ते | भावनांची हाताळणी |
| विद्याव्रत पोथीचा अर्थ | वा. भाग्यश्री हर्षे | संस्कृत श्लोकांचे आणि संदर्भांचे स्पष्टीकरण |
| सामाजिक विकसन | सुवर्णा गोखले | ज्ञान प्रबोधिनीच्या ग्राम विकसन विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या महिला बचत गटाचे काम आणि त्या संबंधातील अनुभव कथन. |
| बौद्धिक विकसन | वा. मिलिंदराव नाईक | बुद्धिमत्तेचा उपयोग सृजन आणि संशोधनासाठी करणे म्हणजेच देशाला बलशाली करण्यात हातभार लावणे. |
| आत्मगुणांचे विकसन | मा.गिरीशराव बापट | जाणिवेचे विविध स्तर आणि 'स्व' ची ओळख. |

विद्याव्रताच्या अंतर्गत 'सज्जनगड' येथे दि. २१ ते २३ जानेवारी २०१९ या काळात मुलींचे व दि. २३ ते २५ जानेवारी २०१९ मुलांचे शिबिर झाले. व्रतार्थींचे जीवन जवळून बघणे व त्याचा थोडा स्वत: देखील अनुभव घेणे हा शिबिराचा हेतू होता. या शिबिरात उपासना, व्यायाम, श्रमकार्य, भजन, दैनंदिनी लेखन या नेहमीच्या सत्रांबरोबरच पुढील गटश: सत्रांची योजना केलेली होती - वादविवाद, भित्तीपत्रके तयार करणे, विविधांगी विचार, अडथळ्यांची शर्यत, सज्जनगड नकाशा व इतिहास इत्यादी. मा. संचालकांनी शिबिरात दोन्ही गटांना मार्गदर्शन केले.

दि. ८ व ९ फेब्रुवारीला अनुक्रमे इ. ८वी मुले व मुलींचा विद्याव्रतग्रहण कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना आशीर्वाद देण्यासाठी मुलांकडे मा.श्री. संजयगुरूजी गोडबोले व मुलींकडे मा.वा.स्वर्णलता भिशीकर यांना निमंत्रित केले होते.



## २.२ गणेशोत्सव :

दि. १३ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०१८ या कालावधीत गणेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

| दिनांक | आरतीचे पाहुणे |
|---|---|
| १३/०९/२०१८ | प्रतिष्ठापना – मा. श्री. राजेंद्र मुठे – विशेष कार्यकारी अधिकारी |
| १४/०९/२०१८ | मा. डॉ. अनंतभूषण रानडे |
| १५/०९/२०१८ | मा. श्रीमती हेमाताई डोळे |
| १८/०९/२०१८ | मा. ब्रिगेडिअर अभय भट |
| १९/०९/२०१८ | मा. डॉ. निलांगी सरदेशपांडे |
| २०/०९/२०१८ | मा. डॉ. मृण्मयी साठे |
| २१/०९/२०१८ | मा. श्री. शशांक चांदोरकर |
| २३/०९/३०१८ | उत्तरपूजा – श्री. राहुल खेले |

गणेशोत्सवानिमित्त इ. ५वी ते ८वीच्या गटासाठी विविध अभिव्यक्तींच्या सादरीकरणाची योजना केलेली होती. त्यात पुढील सादरीकरणे झाली.

**अभिव्यक्ती– सादरीकरण (इ. ५वी ते ८वी)**

| दिनांक | विषय | सादरकर्ते |
|---|---|---|
| १४.०९.१८ | नृत्य | मधुराताई आफळे |
| १८.०९.१८ | तबला, मोहनवीणा, बासरी | श्री. मंगेश करमरकर व सहकलाकार |
| १९.०९.१८ | चित्रकारांच्या पत्रांचे वाचन | नितीन हडप, अमृत सामक |
| २०.०९.१८ | लेखक तुमच्या भेटीला | श्री. अनिल अवचट |
| २१.०९.१८ | लेखक तुमच्या भेटीला | वा. अश्विनी धोंगडे |

गणेशोत्सवानिमित्त इ. ९वी, १०वीच्या गटासाठी विविध कार्यशाळांची योजना केलेली होती.

**कार्यशाळा : इ. ९वी, १०वी (मुले)**

| विषय | मार्गदर्शक |
|---|---|
| गणितीय प्रारूप | श्री. आदित्य पोंक्षे |
| सहा सोनेरी पाने | श्री. प्रांजल अक्कलकोटकर |
| आरेखन | श्री. रोहित हरीप, श्री. प्रणव पुजारी |

**कार्यशाळा : इ. ९वी, १०वी (मुली)**

| विषय | मार्गदर्शक |
|---|---|
| वनस्पती वर्गीकरण शास्त्र | निवेदिता गडीकर,ऋजुता देशमुख |
| पाककला | सौ. मीरा गोसावी |
| चित्रपट रसास्वाद | मृण्मयी वैशंपायन, ओंकार जाधव |

## २.३ बौद्धिक प्रगल्भता :


### १) विशेष व्याख्याने :

यावर्षी पाठ्यविषयांशी निगडित आणि काही अन्य विषयांवरील व्याख्यानांची योजना विद्यार्थ्यांसाठी केलेली होती. त्यात पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

| दिनांक | विषय | वक्ते | इयत्ता |
|---|---|---|---|
| ६, ७ जून | न्यूरोसायन्समधील संशोधन | उत्तरा टिपणीस | इ. ९वी, १०वी |
| १२ जून | 'आर्मीतील संधी' | कर्नल अनुप बरबरे | इ. ९वी, १०वी मुले |
| २० जून | योगदिनानिमित्त व्याख्यान | श्री. राघव अष्टेकर | इ. ५वी ते १०वी |
| २३ जून | लेखन प्रकल्प कसे करावेत | अंजली रानडे, सुनिला गोंधळेकर | इ. ८वी |
| ४, ५ जुलै | अग्निशामन प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | इ. ५वी ते १०वी |
| १० जुलै | कर्करोग जनजागृती | श्री. प्रशांत दुबे | इ. ५वी ते १०वी |
| १७ ऑगस्ट | कळ्यांचे ऋतु- पुस्तक प्रकाशन | सौ. आश्लेषा महाजन | इ. ८वी, ९वी |
| २२ सप्टेंबर | प्लॅस्टिक व पर्यावरण | श्री. राजीव बसर्गेकर | इ. ९वी |
| १२ ऑक्टोबर | विक्री कौशल्य | श्री. महेंद्र सेठिया | इ. ५वी ते ७वी |
| २२ जानेवारी | हवेचे प्रदूषण | भवताल संस्था | इ. ६वी ते ८वी |

इ. १०वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्षेत्र निवडीसाठी विचारांना चालना देणारी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली.

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १ एप्रिल २०१८ | कार्यक्षेत्र निवडताना | श्री. विवेक वेलणकर |
| | सागरविज्ञान - भूगोल | श्री. सुरेंद्र ठाकूरदेसाई |
| | पत्रकारिता | श्री. संजय तांबट |
| | सैन्यदल कर्नल | श्री. अनुप बरबरे |
| | ऊर्जा-संशोधन | श्री. संतोष गोंधळेकर |
| | इर्मा (IRMA) | डॉ. अजित कानिटकर |
| २ एप्रिल २०१८ | कार्यक्षेत्र निवडताना | डॉ. श्रीराम गीत |
| | कृषिक्षेत्र | सौ. गौरी कापरे |
| | प्रशासकीय अधिकारी | श्रीमती मीनल पोटे |
| | डिझाईन | श्री. किरण सबनीस |





**२) विशेष वर्ग :**

**१. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा :**

दि. १ एप्रिल २०१८ ते  २७ ऑक्टोबर २०१८, सोमवार ते गुरूवार सकाळी ९.४५ ते १०.४५ ह्या वेळात हे मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आले होते. ह्या वर्गांना खालील अध्यापकांनी मार्गदर्शन केले.

| | | | |
|---|---|---|---|
| भौतिकशास्त्र | – प्रा. अभय लिमये | रसायनशास्त्र – | प्रा. अभिजित चव्हाण |
| जीवशास्त्र | – प्रा. मनिषा मोडक | राज्यशास्त्र – | प्रा. रेखा पळशीकर |
| भूगोल | – प्रा. आमोद काटीकर | इतिहास – | प्रा. संस्कृती बापट |
| गणित | – प्रा. विजय वाघ | इंग्रजी – | प्रा. रागिणी नाईक |
| बुद्धिमत्ता | – प्रा. आकाश चौकसे | | |

परीक्षेपूर्वी एक आठवडा अभ्यासशिबीर घेण्यात आले. दि. ४ नोव्हेंबर २०१८ रोजी प्रत्यक्ष परीक्षा झाली. ह्या परीक्षेचा निकाल मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लागला. ह्या राज्यस्तरीय फेरीत प्रशालेतील पुढील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली –

| | |
|---|---|
| कु. स्पृहा सरनाईक | कु. प्रियांका दाते |
| कु. गौरी ठोंबरे | चि. ओम चव्हाण |
| चि. प्रतीक चित्रे | चि. अर्थव सूर्यवंशी, |
| चि. अर्थव चौरे | चि. अखिलेश विघाटे |

गेल्या वर्षी झालेल्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेच्या दुसऱ्या स्तरांचा निकाल लागला. त्यात कु. सानिका गुमास्ते, चि. अखिल अत्रे  यांना शिष्यवृत्ती मिळाली.

**३) शिष्यवृत्ती वर्ग :**

महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे प्रतिवर्षी इ. ५वी आणि ८वी साठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. यासाठीचे मार्गदर्शन वर्ग दि. १९ जून  ते ७ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत घेण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन वर्ग सकाळी ९.४५ ते १०.४५ (सोमवार ते गुरूवार) या वेळात झाले. प्रत्यक्ष परीक्षा २४ फेब्रुवारी २०१९ रोजी झाली. ह्या वर्गासाठी खालील अध्यापकांनी मार्गदर्शन केले.



| विषय | इ. ५वी | इ. ८वी |
|---|---|---|
| गणित | प्रा. आसावरी चंद्रचूड | प्रा. विजय वाघ |
| मराठी | प्रा. रूपाली धर्माधिकारी | प्रा. अश्विनी जोशी |
| इंग्रजी | प्रा. हेमांगी देशमुख | प्रा. रागिणी नाईक |
| बुद्धिमत्ता | प्रा. आसावरी चंद्रचूड | प्रा. संस्कृती बापट |

**४) होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धा :**

या वर्षीपासून इ. ९वीसाठी होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचे मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले. पहिल्या सत्रात सोमवार ते गुरूवार सकाळी ९.४५ ते १०.४५ या वेळात हे मार्गदर्शन वर्ग झाले. खालील अध्यापकांनी मार्गदर्शन केले.

भौतिकशास्त्र – प्रा. योगिनी महाडदळकर | रसायनशास्त्र – प्रा. माया भानू
जीवशास्त्र – प्रा. तुषार बोरोटीकर | गणित – प्रा. केतकी जोशी


**५) महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा :**

ह्या वर्षीपासून इ. ९वीसाठी महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेचे मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले. द्वितीय सत्रात सोमवार ते गुरूवार सकाळी ९.४५ ते १०.४५ या वेळात हे मार्गदर्शन वर्ग झाले. खालील अध्यापकांनी मार्गदर्शन केले.

बुद्धिमत्ता व इतिहास – प्रा. संस्कृती बापट | भूगोल – प्रा. आमोद काटीकर

## २.४ अभ्यास शिबिरे :

इ. १०वी मुले – इ. १०वी मुलांसाठी दि. २९ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत अभ्यास शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये वेळेचे नियोजन, अभ्यासाचा आवाका येणे, अभ्यासक्रम



विश्लेषण, विषयशः टिपणे, संकल्पना याद्या, प्रश्नपत्रिका सोडवणे, गणितयज्ञ, गटचर्चा, अवघड संकल्पनांचे अध्यापन, जोडीकार्य, उजळणीच्या पद्धती, प्रश्नावल्या तयार करणे व अनुभवकथने अशी सत्रे योजण्यात आली होती. यामुळे मुलांना आपल्या झालेल्या अभ्यासाचे विश्लेषण करता आले व कोणत्या भागावर भर देऊन कोणत्या तंत्राचा वापर करून प्रभावी अभ्यास करावा याविषयी जाणीव झाली.

इ. १०वी मुली – इ. १०वी मुलींसाठी दि. २ ते ४ जानेवारी या कालावधीत अभ्यास शिबिर घेण्यात आले. यामध्ये अभ्यासतंत्रे, परीक्षातंत्रे, तणावाचे व्यवस्थापन, प्रश्नपत्रिका सोडवणे, गटकार्य, प्रश्नावली तयार करणे इ. सत्रांचा अंतर्भाव होता.



## २.५ विशेष अभिरुची गट :

दि. ४ जून, २०१८ पासून विशेष अभिरुची वर्ग प्रशालेत सुरू करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांना शालेय विषयांबरोबरच अन्य काही शिकावेसे वाटत असते. प्रत्येकाच्या अभिरुचीप्रमाणे त्याला ते शिकता आले पाहिजे. परंतु शाळेच्या ११ ते ७ ह्या चौकटीत ते शक्य नाही. म्हणून सुरुवातीला इ. ६वी व ७वी ह्या दोन इयत्तांसाठी सोमवार ते गुरूवार ९.४५ ते १०.४५ ह्या वेळात हे वर्ग सुरू करण्यात आले. हे वर्ग ४ जून ते १४ मार्च २०१९ पर्यंत घेण्यात आले.

दहा विद्यार्थ्यांच्या गटाने एखादा विषय शिकवण्याची मागणी केल्यास असा वर्ग सुरू करण्यात येतो. ह्या वर्षी प्रशालेत पुढील विशेष अभिरुची गट सुरू आहेत.

| | |
|---|---|
| चीनी भाषा (स्तर १ व २) | जर्मन भाषा |
| फ्रेंच भाषा | चित्रकला |
| धडपड प्रयोगशाळा | नाट्य |
| बुद्धिबळ | संगणक |



## २.६ प्रकल्प शिबिर :

इ. ८वीतून ९वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय संशोधन पद्धती समजावी व त्याप्रमाणे त्यांनी पुढील वर्षभराचे प्रकल्प करावेत यासाठी एप्रिलध्ये प्रकल्प प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यामध्ये खालील विषयांबद्दल मार्गदर्शन केले गेले.

१) Observation and questioning

२) Variable analysis

३) Experimental Design (theory and practical)

४) Data analysis

५) Initial Brainstorming and Project Time Frame

६) Question Framing and Literature Survey

प्रा. शांतलाताई, प्रा. मायाताई, प्रा. प्रणवदादा, प्रा. नचिकेतदादा, प्रा. शुभमदादा, प्रा. सोहमदादा, प्रा. संकेतदादा, प्रा. तुषारसर, प्रा. उपेंद्रसर हे अध्यापक या शिबिराला उपस्थित होते.



## २.७ पुनर्भरण वर्ग :

इ. १०वी अभ्यासाकडे विशेष लक्ष द्यावे लागणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेपूर्वी व दलाच्या वेळात पुनर्भरण वर्गाची योजना या वर्षीपासून सुरू केली. यामध्ये सकाळी अध्यापकांकडून विषय शिकणे व संध्याकाळी स्वयंअध्ययन करणे अशी रचना केली होती.



# ३. सामाजिक जाणीव

## ३.१ नागरी वस्ती गट उप्रकम :

२०१८–१९ हे वस्ती उपक्रमाचे चवथे वर्ष. यावर्षी प्रकल्प समन्वयक श्री. सचिन ओव्हाळ यांनी या उपक्रमाची पूर्ण जबाबदारी घेतली होती. दांडेकर पूल वस्तीतील २६ विद्यार्थ्यांसाठी भाषा, विज्ञान, गणित, आरोग्य, कला–कौशल्य व परिस्थितीज्ञान या विषयांच्या तासिका घेण्यात आल्या. दररोज सायं. ६.१५ ते ८ या वेळात हे वर्ग घेतले गेले. शनिवार, रविवार संध्याकाळी मुलींसाठी कराटेचे वर्ग घेण्यात आले. दैनंदिनी लेखन, पद्यगायन, पाढे पाठांतराचा दैनंदिन तासिकांमध्ये समावेश होता. खालील उपक्रम वर्षभरात घेण्यात आले –



- कागदकाम
- पणत्या रंगवणे व विक्री करणे
- संस्कार वर्ग (रविवारी सकाळी) – ध्यान, खेळ, पोहणे
- मुलींसाठी कराटेचे वर्ग – ब्लॅकबेल्ट सन्मिता पालखे या ताईंनी यात मदत केली.
- छात्र प्रबोधन अंकाचे वाटप, सामूहिक वाचन व कृती कार्यक्रम
- ग्रंथालय – क्रमिक तसेच गोष्टींची पुस्तके, ऐतिहासिक व चरित्रात्मक पुस्तकांचा अंतर्भाव यात केला आहे.
- सहाध्यायदिन – महात्मा फुले संग्रहालयास भेट
- विशेषदिन आयोजन – प्रजासत्ताक दिन, संविधान दिन साजरे केले.

या प्रकल्पास नातू फौंडेशनतर्फे रु. २५,०००/– चा पुरस्कार मिळाला.

## ३.२ सहाध्याय दिन :

सहाध्याय दिनाच्या निमित्ताने यावर्षी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संस्थांना भेटी देऊन नवनवीन अनुभव घेतले.

| वर्ग | उपक्रम / स्थळ |
|---|---|
| इ. ५वी | कात्रज डेअरी, केळकर संग्रहालय, |
| इ. ६वी | रुईया मूकबधिर विद्यालय |
| इ. ७वी | भीमसेन जोशी कलादालन भेट, प्रबोधिनी परिसरातील जैवविविधता<br>आकाशदर्शन – पाबे गाव |





इ. ८वी आयसर प्रकल्प प्रदर्शनास भेट, सिंहगड सायकल सहल (मुले) दक्षिणी सैन्य मुख्यालय भेट, भावनिक विकसन कृतीसत्र (मुली)

इ. ९वी वेल्हे – ग्रामीण भागातील अर्थशास्त्र – आठवडी बाजारास भेट

● अध्यापक व कर्मचारी सदस्य ● वेल्हे भागातील ग्रामविकसनाचे काम समजावून घेणे

**जपान अभ्यासदौरा :**

'Japan Asia Science Exchange Program' या विद्यार्थी विनिमय योजनेअंतर्गत प्रशालेतील दहा विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व अध्यापक श्री. प्रणव पुजारी यांनी जपानला दि. ७ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान भेट दिली. तेथे होक्काइडो इंटरनॅशनल सायन्स फेअरमध्ये त्यांनी केलेले शास्त्रप्रकल्प सादर केले. प्रकल्प स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. त्यामध्ये तीन विद्यार्थ्यांनी बक्षीसे मिळवली. विविध विषयांवरील तज्ज्ञांची व्याख्याने, गटकार्ये, कोसाईशाळेस भेट, होक्काइडो ऐतिहासिक गावास भेट असा भरगच्च कार्यक्रम होता. पुढील विद्यार्थी या दौऱ्यात सहभागी झाले होते.

तन्वी जोशी, अनुष्का भोईर, आर्वा बावकर, कल्याणी नागुरे, साहिल केळकर, अर्थव बेंडाळे, जय पोटे, गौतम राजहंस, चिन्मय गुरूजी, विश्वजीत उगले.

## ३.३ आषाढी एकादशी– वारीतील सहभाग :

आषाढी एकादशीच्या निमित्ताने युवक-युवती विभागातर्फे वारीच्या उपक्रमाची योजना केली होती. वारीतील सहभागातून संस्कृती व परंपरा यांची ओळख आणि श्रद्धा व भक्ती यांचे प्रत्यक्ष दर्शन ही उद्दिष्टे साध्य झाली. तसेच समाजातील विविध घटकांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. इ. ५वी ६वीचे विद्यार्थी परिसरातील विविध दिंड्यांमध्ये सहभागी झाले. इ. ७वी ते ९ वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा पुढीलप्रमाणे वारीत सहभाग होता.

| वर्ग | टप्पा |
|---|---|
| इ. ७ वी मुले | पुणे ते हडपसर |
| इ. ८ वी व ९ मुले | तरडगाव ते फलटण |
| इ. ८ मुली व ९ मुली | विश्रांतवाडी ते पुणे |

## ३.४ स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन :

**१५ ऑगस्ट २०१८ :** स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजवंदन झाले. यावेळी मोठ्या गटाकडे युवक विभागातील कौस्तुभ दाणी, विराज देवचके, अनिकेत पांडे, अथर्व दंडवते या युवकांनी भारतभरात केलेल्या अभ्यासदौऱ्यांचे निवेदन केले व मा. महेंद्रभाई सेठिया यांनी समारोप केला.

छोट्या गटासाठी इ. ७वी गुणविकास योजनेचा बक्षीस समारंभ योजला होता. यास प्रमुख पाहुणे म्हणून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे विश्वस्त व प्रशालेचे माजी विद्यार्थी डॉ. सचिन गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**२६ जानेवारी २०१८ :** प्रजासत्ताकदिनानिमित्त ध्वजवंदन झाले. या निमित्ताने मोठ्या गटाकडे श्री. अक्षय जोशी यांनी भारतीय नागरीकत्व या विषयावर व्याख्यान दिले. छोट्या गटाकडे प्रा. सुहासिनीताई देशपांडे यांनी योगी अरविंद यांचे चरित्र सांगितले.

# ४. मानसिक समृद्धी



## ४.१ वर्षारम्भ, वर्षान्त व साप्ताहिक उपासना :

दि. १६ जून रोजी वर्षारंभ उपासना झाली. उपासनेसाठी छोट्या गटाकडे प्रशालेचे माजी विद्यार्थी कर्नल अनुप बरबरे व मोठ्या गटाकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. यादिवशी विद्यार्थ्यांनी नव्या वर्षासाठी केलेल्या वैयक्तिक व वर्गश: संकल्पांचे निवेदन केले. मा. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना संकल्पपूर्तीसाठी मार्गदर्शन केले व आशीर्वाद दिले.

**इ. ५ वी विद्यारंभ :**

दि. ६ जून रोजी इ. ५वी चा वर्ग प्रवेशता झाला. मा. प्राचार्यांशी संवाद, पद्यगायन, खेळ, विभाग पाहणे, थ्रीडी फिल्म पाहणे, प्रयोग पाहणे, आईस्क्रीम खाणे व तांत्रिक सूचना, दल असा त्यांचा दिनक्रम होता.

दि. १२ जून रोजी इ. ५वीची विद्यारंभ उपासना झाली. या कार्यक्रमात इ. ५वीच्या विद्यार्थ्यांचे सर्व पालकही सहभागी झाले होते. उपासनेनंतरच्या सभेत मा. अनघाताई लवळेकर यांनी मार्गदर्शन केले.

## ४.२ साप्ताहिक उपासना व चिंतन :

साप्ताहिक उपासेनत दर शनिवारी लहान गटात शक्तिमंत्र व शिवमंत्राची उपासना झाली. उपासनेनंतर एकात्मता स्तोत्राचे पठण व या स्तोत्रात उल्लेखिलेल्या व्यक्तीचरित्रांचे कथन अध्यापकांनी केले. मोठ्या गटात शक्तिमंत्र, विरजामंत्र व गायत्रीमंत्राची उपासना झाली. उपासनेनंतर चिंतनामध्ये खालील विषयांवर विविध कार्यकर्त्यांनी व अध्यापकांनी मांडणी केली.

**उपासना चिंतनाचे विषय**

| | |
|---|---|
| प्रबोधिनीतील शिक्षण | प्रबोधिनी परिचय |
| आप्पांच्या आठवणी | इतिहास कसा अभ्यासावा |
| ध्यास पराक्रमाचा | अटलबिहारी वाजपेयी |
| बाह्यरंग-अंतरंग | रामानुजन |
| स्वदेशी | पंचांगातील कालमापन व सौरमापन |
| धीरुभाई अंबानी | अरुणाचलची संस्कृती |
| सूरदासांचे काव्य | रघुनाथ माशेलकर |
| डॉ. रामाणी | समाजमूल्य |
| भूतानचा आनंदाचा निर्देशांक | सावधपण |
| मणिपूरमधील काम | डोंबिवली गणेशोत्सव स्वच्छता अभियान |

इ. १०वी ची वर्षान्त उपासना दि. २१ फेब्रुवारी रोजी झाली व इ. ५वी ते इ. ९वी वर्षान्त उपासना दि. २८ एप्रिल रोजी झाली. दोन्हीकडे प्राचार्य डॉ. मिलिंदराव नाईक यांनी मार्गदर्शन केले.

## ४.३ आषाढी एकादशी भजन गायन :

आषाढी एकादशी निमित्त दि. २३ जुलै रोजी इ. ७वी ते १०वीचे विद्यार्थी-विद्यार्थीनी व प्रबोधिनीतील सर्व विभागांमधील सदस्य यांनी एकत्रित भजन गायन केले.

# ५. शारीरिक कौशल्य

## ५.१ दैनंदिन क्रीडादले :

युवती गटाकडे सोमवार ते गुरूवार दररोज व्यायाम व वर्गश: खेळ व इ. ७वी ते १०वी साठी खो-खो, कबड्डी, रोप, थलेटीक्स् व काही बॉल गेम्स हे नियमितपणे झाले. गणेशोत्सवामधे इ. ८वी ते १०वीच्या मुली बर्ची नृत्यात सहभागी झाल्या व विविध गणेश मंडळांच्या समोर प्रात्यक्षिके सादर केली.

युवक दलांवरती इ. ५वी ते ७वीच्या मुलांसाठी दैनंदिन व्यायामाबरोबर लंगडी, डॉजबॉल, टेन पासेस, कुस्ती, जिमनॅस्टिक्स, मल्लखांब इ. खेळ तर इ. ८वी ते १०वीसाठी कबड्डी, हँडबॉल, बेसबॉल व खो-खो हे खेळ नियमितपणे झाले. गणेशोत्सवामधे इ. ८वी ते १०वी मुले बर्ची नृत्ये व प्रात्यक्षिकांमधे सहभागी झाली. तर इ. ५वी ते १०वी मेळे, विक्री उपक्रम, अर्थवशीर्ष पठण यामधे सहभागी झाली.



## ५.२ क्रीडाशिबिरे :

समूहजीवनाचा आनंद घेत त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये व वृत्ती आत्मसात करण्याच्या हेतूने विविध शिबिरे डिसेंबर अखेर घेण्यात आली.

| इयत्ता | युवक | युवती |
|---|---|---|
| ५वी | क्रीडा शिबिर | क्रीडा शिबिर |
| ६वी | क्रीडा शिबिर | क्रीडा शिबिर |
| ७वी | शहर परिचय शिबिर | क्रीडा शिबिर |
| ८वी | विद्याव्रत शिबिर | विद्याव्रत शिबिर |
| ९वी | ग्रामीण परिचय शिबिर | तंबू शिबिर |
| १०वी | अभ्यास शिबिर | अभ्यास शिबिर |

## ५.३ गिरीभ्रमण सहली :

स्वत:च्या शारीरिक क्षमता ताणून सहकाऱ्यांच्या बरोबर दऱ्याखोऱ्यांमधे भटकत इतिहासामधे रमून जात गिरीभ्रमण करणे हा एक अविस्मरणीय ठेवा असतो.

| इयत्ता | युवक | युवती |
|---|---|---|
| ५वी | विसापूर, रायरेश्वर, वैराटगड | शिवनेरी |
| ६वी | विसापूर, रायरेश्वर, वैराटगड | लोहगड |
| ७वी | विसापूर, रायरेश्वर, वैराटगड | तिकोना |
| ८वी | गोरखगड, सिद्धगड | सुधागड |
| ९वी | सुधागड, तेलबैला | तोरणा |
| १०वी | सुधागड | राजगड |





# ६. नेतृत्व गुणविकास

## ६.१ अग्रणी प्रशिक्षण शिबिर :

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षामधे अग्रणी म्हणून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षणासाठी फेब्रुवारी महिन्यात शिबिराची योजना करण्यात आली होती. यामध्ये नेतृत्वाची संकल्पना, नेत्याची कामे, अग्रणीयोजना स्वरूप व नियोजन कौशल्य यावर सत्रे झाली. मा. प्राचार्य मिलिंद नाईक व प्रा. रागिणीताई नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## ६.२ प्रार्थनेनंतरचे वक्तृत्व :

नेतृत्वगुण संवर्धनाच्या दृष्टीने वक्तृत्व कौशल्य हे अत्यंत महत्त्वाचे कौशल्य आहे. इ. ५वी पासूनच विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्यांचा क्रमश: विकास व्हावा या उद्देशाने प्रशालेत हा उपक्रम राबविला जातो. संपूर्ण वर्षभरात प्रत्येक विद्यार्थी किमान एकदा सभेसमोर बोलतो. त्यासाठी दररोज प्रार्थनेनंतर तीन विद्यार्थी व तीन विद्यार्थिनी यांना सभेसमोर बोलण्याची संधी मिळेल अशी योजना केलेली होती. प्रत्येक इयत्तेसाठी विशिष्ट विषय नेमून दिलेले होते. त्याप्रमाणे यावर्षी विद्यार्थ्यांनी पुढील विषयांमध्ये वक्तृत्व सादर केले होते.

| **इयत्ता** | **विषय** | **इयत्ता** | **विषय** |
|---|---|---|---|
| इ. ५वी | कविता सादरीकरण | इ. ८वी | पुस्तक परीक्षण |
| इ. ६वी | उतारा / नाट्यछटा सादरीकरण | इ. ९वी | उद्योजकांचे चरित्र |
| इ. ७वी | कथाकथन | इ. १०वी | विविध देशांच्या राष्ट्रवादी चळवळी |

या वक्तृत्वाचे मूल्यमापन वर्गाध्यापक व अधिमित्रांनी केले.




## ६.३ गुरूपौर्णिमा :


अग्रणी योजनेअंतर्गत इ. १० वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपापल्या वर्गासाठी गुरूपौर्णिमेनिमित्त गुरूपूजनाच्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले होते. त्यात खालील अभ्यागतांनी मार्गदर्शन केले.

| वर्ग | विषय | वक्ते |
|---|---|---|
| ५वी मुली | अनुभवकथन | मा. हर्षाताई किर्वे |
| ५वी मुले | गुरू-शिष्य नाते | मा. प्रशांत दिवेकर |
| ६वी मुली | गुरू-शिष्य | मा. अनघाताई लवळेकर |
| ६वी मुले | गुरूपूजन | मा. संचालक |
| ७वी मुली | माझे गुरू | मा. डॉ. धनंजय केळकर |
| ७वी मुले | सत्-शिष्य लक्षणे | मा. सुजलाताई वाटवे |
| ८वी मुली | गुरूपूजनाचे महत्त्व | मा. संचालक |
| ८वी मुले | सामाजिक विकसन - अनुभवकथन | मा. विवेक गिरीधारी |
| ९वी मुली | काश्मीर प्रश्न -अनुभवकथन | मा. सारंगदादा गोसावी |
| ९वी मुले | सत् शिष्य लक्षणे | मा. रामभाऊ डिंबळे |
| १०वी मुली | राष्ट्रीय एकात्मता | मा. सनत भाटे |
| १०वी मुले | आप्पांच्या कल्पनेतील युवक | मा. सुभाषराव देशपांडे |

## ६.४ अग्रणी तासिका :

इ. ५वी ते १०वीच्या अग्रणींनी आपापल्या वर्गावर विविध कौशल्ये शिकविण्यासाठी व माहितीपर अशा साप्ताहिक तासिका घेतल्या. वर्गाध्यापकांनी या तासिकांचे परीक्षण केले.



# ७. अध्यापक प्रशिक्षण व बैठका

## ७.१ अध्यापक प्रशिक्षणे :

सन २०१८-१९ मध्ये साप्ताहिक अध्यापक बैठकी, वर्गाध्यापक बैठकी, अधिमित्र बैठकी, विषय समन्वयक बैठकी याबरोबरच महिनाअखेर अध्यापक प्रशिक्षणाची सुरुवात झाली.

*** महिनाअखेर अध्यापक प्रशिक्षण :**

'टेक्नीक्स ऑफ टीचिंग' या पुस्तकावर आधारित वर्गाध्यापनासाठी आवश्यक तंत्रे याविषयीची मार्गदर्शन तासिकांची मालिका मा. प्राचार्यांनी दरमहा घेतली. याशिवाय प्रा. ललिता वर्तक, प्राचार्य - आदर्श शिक्षणशास्त्र महाविद्यालय, यांनी 'बुद्धिमान मुलांना कसे शिकवावे' या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. गिरीश दातार यांनी 'हराडा' तंत्र' या जपानी व्यवस्थापन तंत्राची ळख करून दिली. डॉ. प्रणिता जगताप 'विजिगीषु वृत्ती' या विषयावर त्यांनी केलेल्या संशोधनाची मांडणी केली.

प्रा. मिलिंद नाईक, प्रा. प्रशांत दिवेकर व नचिकेतदादा नित्सुरे या तिघांनी मिळून पुण्याच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीवर अध्यापकांचे गटकार्य घेतले.

याशिवाय विषय समन्वयकांनी आपापल्या विषयांसाठी तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने व अध्यापनाचा आढावा घेतला.

२५ डिसेंबर रोजी प्रा. शिरीष जोशी व श्री. मिलिंद संत यांनी अभिव्यक्ती अध्यापकांचे एक दिवसीय प्रशिक्षण घेतले.

## ७.२ अध्यापक बैठका :

दर मंगळवारी सर्व अध्यापकांसाठी, दर बुधवारी वर्गाध्यापकांच्या गटासाठी व दर शुक्रवारी अधिमित्रांसाठी बैठकींची योजना केलेली होती. त्या अंतर्गत अध्यापकांना मार्गदर्शक अशी काही व्याख्याने झाली व विविध विषयांवर वाचन व चर्चा झाली.

*** मंगळवार अध्यापक बैठका विषय-**

मंगळवार अध्यापक बैठकांमधे पुढील विषयांवर चर्चा झाली.

बुद्धीची भारतीय संकल्पना, विद्यारंभ व वर्षारंभ उपासना, शिक्षणविषयक लेखवाचन, त्रिवेणी शिक्षण पद्धती, स्वा. सावरकरांचे शिक्षणविषयक विचार, विभाग परिचय : शिक्षक प्रशिक्षण केंद्र, ग्रामविकसन विभाग, नैसर्गिक संसाधने विभाग, वक्तृत्व, परीक्षा, आषाढी एकादशी नियोजन, संचालक भेट नियोजन, गुरूगौरव पुरस्कार- मानपत्र वाचन, गणेशोत्सव खाते वाटप नियोजन, मा. जावडेकर भेट शोधबोध, अध्यापक विनिमय कार्यक्रम-निवेदन, प्रशाला संचालक भेट, अध्यापक सहल-वेल्हे नियोजन व निवेदन, प्रथम सत्र निकाल मूल्यमापन मार्गदर्शन, शिकवताना संगणकाचा वापर अभिव्यक्ती शिबिर निवेदन, काही शिक्षणवेत्ते - पुस्तकवाचन व चर्चा, जे. कृष्णमूर्तींचे शैक्षणिक विचार, वर्गविषयक समस्या व पुढील कार्यवाही, बंगलोर, अहमदाबाद, दिल्ली अभ्यासदौरे निवेदन व अनुभव कथन, इ. ५वी प्रवेश चाचणी.

* **वर्गाध्यापक व अधिमित्र बैठका :**

वर्षारंभाची कामे, सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन, कार्यसंकल्प, सामाजिक जाणीव, अग्रणी योजना, कार्यक्रम नियोजन, भावनिक विकसन, बौद्धिक विकसन, मूल्यमापन प्रश्नावली, गणेशोत्सव कार्यक्रम, मूल्यमापन निकष, शिक्षकांचे खरे कार्य-चर्चा.

## ७.३ पालकबैठका :

एप्रिल ते जून या कालावधीत इ. ५वी ते १०वी या वर्गांच्या पालक बैठका झाल्या. यत वार्षिक नियोजन वर्गशः उपक्रम, मूल्यमापन, दले याविषयी माहिती देण्यात आली. जुलैपासून महिना अखेरीस एकेका वर्गाच्या पालकांशी 'मुक्त संवाद दिन' या पद्धतीने बैठकी झाल्या. यामध्ये पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगतीबद्दल शिक्षकांकडून व्यक्तिशः माहिती घेतली.



## ७.४ पालक-शिक्षक संघ बैठका :

या वर्षी दर दोन महिन्यांनी एक याप्रमाणे चार बैठका झाल्या. या बैठकांमध्ये शुल्क वाढीसंदर्भात ठराव, प्रशाला सुवर्णमहोत्सव, सीबीएसईने आयोजित केलेल्या परिषदेत मा. प्राचार्यांचा सहभाग, अभ्यासक्रम बदल, अन्य समस्या, सूचना इ. विषयांवर विचारांची देवाण-घेवाण झाली.



# ८. यश

## ८.१ शालान्त परीक्षा – इ. १०वी निर्णय :

एकूण विद्यार्थी : ८० उत्तीर्ण : १००% सरासरी गुण : ८९%

९०% पेक्षा जास्त ४१ विद्यार्थी ८०% पेक्षा जास्त ७३ विद्यार्थी

**उल्लेखनीय :**

१) अखिल अत्रे – ९८.४%

२) मृण्मयी करवंदे – ९७.२% , गार्गी म्हसकर – ९७.२%

३) ऋता डिके – ९६.८%, गायत्री साने – ९६.८

४) निरंजन चौधरी – ९६.४%

५) मैत्री दोशी – ९६.२%

६) श्रेयस दीक्षित – ९५.८%

७) ऐश्वर्या जोशी – ९५.६%, ईशान नारगोलकर – ९५.६%, आदित्य राठी – ९५.६%

८) सानिका गुमास्ते – ९५.४%, सई कामत – ९५.४%, अनघा लंघे – ९५.४%

९) संकल्प कुलकर्णी – ९५%

## ८.२ बाह्यपरीक्षांतर्गत :

१) **राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा शिष्यवृत्तीधारक :** कु. सानिका गुमास्ते, चि.अखिल अत्रे यांना शिष्यवृत्ती मिळाली.

(राज्यस्तर निकाल) – कु. स्पृहा सरनाईक, कु. प्रियांका दाते, कु. गौरी ठोंबरे, चि. ओम चव्हाण, चि. प्रतीक चित्रे, चि. अर्थव सूर्यवंशी, चि. अर्थव चौरे, चि. अखिलेश विघाटे

२) **महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती परीक्षा :**

इ. ५वी : आर्य गुजर, प्रचिती ढोकळे, समृद्धी कानडे, मुग्धा जोशी, सिद्धा ढोक, स्वानंदी मोहरील

इ. ८वी : मल्हार चिटणीस, ओंकार वडदरे, गौतम राजहंस, चिन्मय गुरुजी, साहिल केळकर, अनुष्का भोईर, कल्याणी नागुरे

३) **होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा :**

आर्य गुजर इ. ६ वी कांस्यपदक

४) **पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ – गणित प्रभुत्व स्पर्धा**

इ. ५वीतील एकूण २४ विद्यार्थ्यांना पारितोषिके

५) **भास्कराचार्य प्रतिष्ठान – मॅथेमॅटिक्स टॅलेंट सर्च स्पर्धा :**

आर्य गुजर इ. ६वी महाराष्ट्रात दुसरा व १६ विद्यार्थ्यांना विशेष नैपुण्य प्रमाणपत्र

६) **राज्यस्तरीय गणित ऑलिंपियाड :**

श्रीवल्लभ पोळ– राष्ट्रीय पातळीसाठी निवड

७) **इन्स्टिट्युट फॉर प्रमोशन ऑफ मॅथेमॅटिक्स् – विशेष नैपुण्य :**

अवनी मंडलिक, प्रचिती ढोकले, सिद्धा ढोक, मारिशा थोरात, आदिती बोबे, आरूशी मालाणी, अनुषा करवा, कौशिक ठाकूर, साहिल केळकर, अनीश पाटील

८) **हिंदुस्थान टाईम्स शिष्यवृत्ती (रु. ३०,००० प्रत्येकी) :**

तन्वी जोशी इ. ९वी, आभा बोंद्रे इ. ७वी, तनुजा चव्हाण इ.६वी

## ८.३ स्पर्धांतर्गत :

**सौ. लक्ष्मीबाई रानडे वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| कृशानु पत्की | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| कौस्तुभ जोशी | ९वी | तृतीय पारितोषिक |

**आंतरशालेय स्पर्धा(विजेतेपदाची द्वितीय ढाल)**

| | | | |
|---|---|---|---|
| **१) मराठी नियोजित भाषण :** | रेवती हिंगणे | ८वी | पाचवे बक्षीस |
| **२) हिंदी नियोजित भाषण :** | आर्या फडणीस | ८वी | चौथे बक्षीस |
| **३) मराठी कविता पाठांतर :** | वैष्णवी उरमोडे | ८वी | सहावे बक्षीस |
| **४) इंग्रजी कविता पाठांतर :** | वीरजा कामठे | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| | सनिका राहिगुडे | ८वी | सहावे बक्षीस |
| **५) समयस्फूर्त भाषण :** | आर्या फडणीस | ८वी | प्रथम पारितोषिक |
| | सई जोशी | ८वी | चौथे बक्षीस |
| **६) मराठी कथाकथन स्पर्धा :** | रमा जोशी | ५वी | द्वितीय पारितोषिक |
| **७) समयस्फूर्त भाषण :** | भक्ती धर्माधिकारी | ६वी | तृतीय पारितोषिक |
| | मुग्धा जोशी | ६वी | प्रशस्तीपत्रक |
| **८) मराठी नियोजित भाषण :** | उत्कर्षा माने | ६वी | द्वितीय पारितोषिक |
| **९) मराठी कविता पाठांतर:** | देवयानी राठोड | ५वी | द्वितीय पारितोषिक |
| | सानिका जोशी | ६वी | सहावे बक्षीस |
| **१०) इंग्रजी कविता पाठांतर :** | रमा जोशी | ५वी | प्रथम पारितोषिक |

**सावरकर वाङ्मय वक्तृत्व स्पर्धा :**

| | | |
|---|---|---|
| **(मोठा गट – एकूण विजेतेपदाची ढाल)** | | |
| अदिती देशमुख | १०वी | प्रथम पारितोषिक |
| आर्या फडणीस | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| सक्षम बोरवणकर | ८वी | तृतीय पारितोषिक |
| रेवती हिंगणे | ८वी | उत्तेजनार्थ |
| **लहान गट** | | |
| पार्थ दीक्षित | ६वी | प्रथम पारितोषिक |
| उत्कर्षा माने | ६वी | द्वितीय पारितोषिक |
| ऐश्वर्या अभ्यंकर | ७वी | द्वितीय पारितोषिक |
| सौमित्र बोरकर | ७वी | तृतीय पारितोषिक |
| शार्दूल कोठी | ५वी | तृतीय पारितोषिक |
| **टि.म.वि. संस्कृत पाठांतर** | | |
| आर्या फडणीस | ८वी | प्रथम पारितोषिक |
| भूमी ठाकरे/ | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| कृशानु पत्की | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| **श्लोक पाठांतर** | | |
| सई जोशी | ८वी | तृतीय पारितोषिक |

**रामकृष्ण मठ :**

| | | |
|---|---|---|
| **पॉवर पॉइंट सादरीकरण** | | |
| कृशानु पत्की, अथर्व निकम, नीरज बापट | ८वी | प्रथम पारितोषिक |
| **पथनाट्य** | | |
| उदिता काळे, तन्वी जोशी, मोहना बर्वे, अनुष्का भोईर, वागिषा कऱ्हाडकर, आर्वा बावकर, ऋजुता कुलकर्णी, नेहा सावरीकर | ८वी | प्रथम परितोषिक |
| **पद्यगायन** | | |
| अर्जुन देवधर, आर्य बक्षी, कौस्तुभ जोशी सात्विक सरोदे, हर्ष भडकमकर,आर्यन जमदाडे, ओंकार वडदरे, साहिल केळकर, ध्रुव लोखंडे, चिन्मय गुरुजी, केवल मेहेता, गौरांग गुणे | ९वी | प्रथम पारितोषिक |
| **संस्कृत पाठांतर** | | |
| सई जोशी | ८वी | प्रथम पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| **वक्तृत्व** | | |
| उत्कर्षा माने(लहान गट) | ६वी | प्रथम पारितोषिक |
| सई जोशी (मोठा गट) | ८वी | प्रथम पारितोषिक |
| **एकपात्री** | | |
| उदिता काळे | ९वी | प्रथम पारितोषिक |
| अन्यना मांडके | ५वी | उत्तेजनार्थ |
| मुक्ता बापट | ७वी | उत्तेजनार्थ |
| **श्री शारदा मठ :** | | |
| **देशभक्तीपर गायन** | | |
| सानिका पवार, संज्ञा कुलकर्णी, उत्कर्षा माने, तेजश्री मराठे, इरा कुलकर्णी, श्रीज्या मेहेंदळे,सानिका जोशी, शर्वरी पवार, राधिका बिरमल, अनाहिता जोशी | ५वी-६वी | द्वितीय पारितोषिक |
| **आंतरशालेय लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा-(विजेतीपदाची ढाल)** | | |
| भक्ती धर्माधिकारी | ६वी | प्रथम पारितोषिक |
| प्रचिती ढोकले | ६ वी | उत्तेजनार्थ |
| कुणाल कुरंदळे | ६ वी | उत्तेजनार्थ |
| मुक्ता बापट | ७वी | उत्तेजनार्थ |
| सई जोशी | ८वी | प्रथम पारितोषिक |
| रेवती हिंगणे | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| आर्या फडणीस | ८वी | उत्तेजनार्थ |
| उदिता काळे | ९वी | प्रथम पारितोषिक |
| **आनंदाश्रम संस्कृत- पाठांतर स्पर्धा** | | |
| नीरज बापट | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| **प्रश्न-मंजूषा स्पर्धा** | | |
| कृशानु पत्की | ८वी | प्रथम पारितोषिक |
| विठ्ठल नवलगुंद | ८वी | प्रथम पारितोषिक |

**छात्रप्रबोधन अभिवाचन स्पर्धा**

विशेष गुणवत्ता पारितोषक + उत्तेजनार्थ - विजेता इ. ८वी

सई जोशी, आर्या फडणीस, श्वेता माने, वैदेही रानडे, हर्षाली कुंजीर, धनश्री बनसोडे, वैष्णवी उरमोडे

| | | |
|---|---|---|
| **दादा फुलंब्रीकर वक्तृत्व स्पर्धा** | | |
| भक्ती धर्माधिकारी | ६वी | प्रथम पारितोषिक |
| मारीशा थोरात | ८वी | तृतीय पारितोषिक |
| मुग्धा जोशी | ६वी | उत्तेजनार्थ |
| **दासबोध पाठांतर स्पर्धा** | | |
| रमा जोशी | ५वी | प्रथम पारितोषिक |
| **आंतरशालेय प्रश्नमंजूषा (मोठा गट)** | | |
| मिहिका खरे, आर्या शहा, आर्या फडणीस, भूमी ठाकरे, तरल बसाळे | ८वी | तृतीय पारितोषिक |
| ऐश्वर्या अभ्यंकर, खुशी राव,अवंती कुमठेकर | ६वी-७वी | द्वितीय पारितोषिक |
| **आंतरशालेय प्रश्नमंजूषा(लहान गट)** | | |
| भक्ती धर्माधिकारी | | मुग्धा जोशी |
| **वैयक्तिक पारितोषिके (आंतरशालेय प्रश्नमंजूषा)** | | |
| उत्कर्षा माने | ६वी | द्वितीय पारितोषिक |
| वैदेही रानडे | ८वी | द्वितीय पारितोषिक |
| वैष्णवी उरमोडे | ८वी | तृतीय पारितोषिक |
| **स्कूलिंपिक्स - १०० मीटर धावणे** | | |
| रुजुला भोसले | ६वी | सुवर्णपदक |

## ८.४ उल्लेखनीय :

- भारत सरकारतर्फे दि. २६ जानेवारी २०१९ परम विशिष्ट सेवा पदक जाहीर !!!

  लेफ्टनंट जनरल मनोज नरवणे - माजी विद्यार्थी, प्रशाला तुकडी १९७६

  लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस - माजी विद्यार्थी, प्रशाला तुकडी १९७७

- मुलींच्या युरोपिअन गणित ऑलिंपियाडमध्ये (EGMO) प्रशालेच्या २०१७ च्या तुकडीच्या रोहिणी जोशीला रौप्यपदक मिळाले. आजवर EGMO मध्ये भारतातील मुलींना कांस्य पदक मिळाले होते. यंदा रोहिणीने प्रथमच रौप्यपदक मिळवले.



मा. मनोज नरवणे



मा. सुदर्शन हसबनीस

# ९. विशेष दखल

## ९.१ केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांची ज्ञान प्रबोधिनीस भेट :

शुक्रवार, दि. १४ सप्टेंबर रोजी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी दुपारी १२ ते १.३० या वेळात ज्ञान प्रबोधिनीस भेट दिली.


ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोग-प्रदर्शनाला, धडपड प्रयोगशाळेला त्यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांशी, अध्यापकांशी संवाद साधला आणि ज्ञान प्रबोधिनीच्या वाटचालीची माहिती घेतली.

यावेळी योजलेल्या सभेत ते म्हणाले, 'रूप पालटू देशाचे' हीच ज्ञान प्रबोधिनीची खरी ओळख आहे. शिक्षण अधिक चांगले करण्यासाठी, राष्ट्रीय धोरण करताना ज्ञान प्रबोधिनीच्या अनुभवाचा निश्चित उपयोग करू.

विशेष बुद्धिमान विद्यार्थ्यांना देशासाठी घडविण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी गेली ५५ वर्ष प्रयत्नशील आहे. प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी समाजाच्या विकासात योगदान दिल्याने हा देशात एक वेगळा प्रयोग आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील शिक्षणक्षेत्र उत्तरदायी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. 'लर्निंग आऊटकम' वर भर दिला जात आहे. नॅशनल असेसमेंट सर्व्हे हेही महत्त्वपूर्ण पाऊल आहे. चांगले अध्यापक घडविण्यासाठी चार वर्षांचा इंटिग्रेटेड बी.एड. अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे.

ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट, कार्यवाह प्रा. सुभाष देशपांडे, प्रा. यशवंतराव लेले, प्रा. वा. ना. अभ्यंकर, डॉ. विवेक कुलकर्णी, प्राचार्य डॉ. मिलिंद नाईक, प्रा. राम डिंबळे, श्री. मोहन गुजराथी या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रशालेतील विक्रम जिरगाळे आणि चिन्मयी खरे यांनी त्यांच्या



प्रकल्पांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मा. प्रकाशजींनी समर्पक उत्तरे दिली. प्रा. संस्कृती बापट यांनी सूत्रसंचालन केले.

विकसित कौशल्ये देशाच्या विकासासाठी उपयोगात आणणारे विद्यार्थी घडविण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी प्रयत्नशील आहे, असे ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट यांनी समारोपात सांगितले.



## ९.२ संचालक भेट :

'मनुष्यघडणीसाठी शिक्षण' या उद्दिष्टानुरूप ज्ञान प्रबोधिनी प्रशाला कार्यरत आहे. देशप्रश्न सोडवणारे कार्यकर्ते तयार व्हावयासाठी इथली शिक्षणप्रणाली काम करते. हे काम सुरळीत चालू राहावे यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन हवेच. आदरणीय संचालक या सर्व कामांची दखल घेत असतात. प्रशालेत होणाऱ्या कामाचे निवेदन आदरणीय संचालकांच्या समोर करण्याची संधी संचालक भेटीच्या निमित्ताने मिळाली. दि. ५ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत संचालकांनी प्रशालेस भेट दिली. आदरणीय संचालकांनी प्रशालेतील प्रत्येक विद्यार्थ्याशी संवाद साधला. अध्यापक व कर्मचारी यांना गटश: बैठकींद्वारे मार्गदर्शन केले. चार दिवस चालेल्या या भेटीमध्ये प्रशालेतील इ. ५वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आदरणीय संचालकांसमोर आपल्या कौशल्यांचे सादरीकरण केले. आदरणीय संचालकांनी प्रत्येक वर्गास मार्गदर्शन केले.

विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी या सर्वांना त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचे सार पुढीलप्रमाणे –

* बोलल्याप्रमाणे आपले गुण प्रकट व्हावयास हवेत.
* आपले पराक्रम हीच मातृभूमिची पूजा आहे.
* आपल्याला तप करून स्वर्ग जमिनीवर आणायचा आहे.
* यंत्र, ऋचा, विज्ञान, काव्य एकाच ठिकाणी पाहायला मिळणं हे प्रबोधिनीचे वैशिष्ट्य आहे.



* प्रबोधिनीत येऊन 'तेज' वाढले पाहिजे. तेज म्हणजे आपल्याला पाहून इतरांची प्रेरणा वाढली पाहिजे.
* आम्ही शुद्ध आहोत, आम्ही बुद्धिमान आहोत, आम्हाला कशाचाही त्रास होत नाही हा मंत्र सतत म्हणायला हवा.
* प्रबोधिनीपणात कृती, गती, प्रगती व्हायला पाहिजे. प्रबोधिनीपण म्हणजे आजचे काम उद्या नाही, आपलं काम दुसऱ्यावर नाही, कालच्यापेक्षा आज पुढं गेलंच पाहिजे, रोज नवीन सुचलंच पाहिजे. * मौन ते अभिव्यक्ती, एकांत ते लोकांत, एकाकी ते सर्वांशी, पुस्तकी ते अनुभवात्मक दोन्ही जमलं पाहिजे.



- **शिक्षणाचे उद्दिष्ट :**

* शालये वयोगटासाठी – भारतावर प्रेम करावे (Love India) ,
* महाविद्यालयीन गटासाठी – भारताबद्दल विचार करा (Think India), यासाठी भाषा, वेशभूषा, सण, करमणूक, तारीख, स्वाक्षरी यात भारतीयत्व हवे. भारत देश हिंडून पाहिला पाहिजे, जाणला पाहिजे. (Live for India)

## ९.३ अध्यापक अभ्यासदौरे

### १) बंगळुरू अभ्यासदौरा :

दि २९ जानेवारी ते दि. २ फेब्रुवारी या कालावधीत बंगळुरू येथे ६ अध्यापकांचा अभ्यासदौरा झाला. बंगळुरू परिसरातील राष्ट्रोत्थान विद्या केंद्राच्या शाळांना भेट दिली. राष्ट्रोत्थान विद्या केंद्राच्या भेटीदरम्यान शाळेचे प्राचार्य वसंत कुमार यांच्याशी भेट झाली. त्यांनी राष्ट्रोत्थान विद्या केंद्राच्या शाळा आणि काम याविषयी थोडक्यात माहिती दिली. तसेच राष्ट्रोत्थान विद्या केंद्राचे मुख्य कार्यालय, आवारातील रक्तपेढी आणि योगकेंद्राला भेट दिली. राष्ट्रोत्थान विद्या केंद्राच्या तपस प्रकल्पांतर्गत शिकणाऱ्या मुलांशी संवाद साधला.

आरोही एज्युकेशन ट्रस्ट, होसूरलाही भेट दिली. जीवन हेच शिक्षण या सूत्रावर चालणारा हा एक सामाजिक प्रयोग आहे.

जे. कृष्णमूर्ती यांच्या तत्त्वज्ञानावर चालणारे द व्हॅली स्कूल या भेटीत पाहिले. याच ठिकाणी कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र आहे. तेथे शैक्षणिक विचारांबद्दल चर्चा झाली.

राष्ट्रोत्थान हेगडेनगर – शाळेला भेट दिली. राष्ट्रोत्थान विद्या केंद्राचे सचिव श्री. गजानन लोंढे यांच्यासोबत राष्ट्रोत्थान चे काम , सुरुवात, विचार आणि एकूण उपक्रम याविषयी सविस्तर चर्चा झाली.

पूर्णप्रमती शाळा, द व्हॅली स्कूल, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डव्हान्स स्टडीज इ. संस्थांना भेट दिली.

### २) अहमदाबाद अभ्यास दौरा :

दि. २५ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत अहमदाबाद येथे प्रशालेतील ६ व नवनगर विद्यालयातील ३ अशा एकूण ९ अध्यापकांचा अभ्यास दौरा झाला. अहमदाबादमधील श्रेयस फाऊंडेशन, तपोवन संस्कार पीठ, रिव्हरसाईड स्कूल, महात्मा गांधी इंटरनॅशनल स्कूल, इन्स्टिट्यूट फॉर रुरल मॅनेजमेंट इ. संस्थांना भेट दिली. भेटीदरम्यान शाळांची कार्यपद्धती, उपक्रम व त्यांचे फलित याविषयी माहिती घेतली. शाळा-मुख्याध्यापक व शाळा-समन्वयक यांच्याशी संवाद साधला.

### ३) दिल्ली अभ्यास दौरा :

दि. ३१ मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत दिल्ली येथे प्रशालेतील ४ व नवनगर विद्यालयातील ७ अशा एकूण ११ अध्यापकांचा अभ्यास दौरा झाला. दिल्लीमधील राजकीय प्रतिभा विकास विद्यालय, आरंभ विद्यालय, अरविंदाश्रमाच्या मिरांबिका, मदर्स इंटरनॅशनल स्कूल तसेच सरदार पटेल विद्यालय, शिक्षण संचालनालय-नवी दिल्ली, सल्वान पब्लिक स्कूल इ. संस्थांना भेट दिली. भेटीदरम्यान शाळांची कार्यपद्धती, उपक्रम व त्यांचे फलित याविषयी माहिती घेतली. शाळा-मुख्याध्यापक व शाळा-समन्वयक यांच्याशी संवाद साधला.



**२०१८-१९ सालात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेस खालील पाहुण्यांनी भेट दिली...**

| दिनांक | संख्या व पद संस्था | उद्दिष्ट |
|---|---|---|
| १५/६/१८ | जम्मू येथील विद्याभारती शाळांमधील अध्यापक व विद्यार्थी | शैक्षणिक आदान-प्रदान |
| १५/८/१८ | राजा श्री शिवराय प्रतिष्ठान माध्यमिक विद्यालय व ज्यु. कॉलेज | ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील उपक्रम बघणे, समजून घेणे. |
| ११/८/१८ | जय शिवराय प्रतिष्ठान संचलित धर्मवीर संभाजीराजे माध्यमिक विद्यालय, तुळापूर येथील मुख्याध्यापक व शिक्षक | ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील उपक्रम बघणे, समजून घेणे. |
| १३/१०/१८ | परमिता स्कूल तेलंगणा - प्रा. प्रसाद राव | ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील उपक्रम बघणे, समजून घेणे. |
| २८/११/१८ | निलिमा रावी, विनोदा कैलास - एन.जी.ओ. | ज्ञान प्रबोधिनीच्या तत्त्वावर नवीन शाळेच्या निर्मितीसाठी |
| ३०/११/१८ | महिला मंडळ संस्था , शहादा | ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील उपक्रम बघणे, समजून घेणे. |



| | | |
|---|---|---|
| १५/१/१९ | श्रीमती लाडकोरबाई प्राथमिक विद्यामंदिर, शहादा | ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील उपक्रम बघणे, समजून घेणे. |
| २९/०३/३०१९ | जपानचे श्री. ताजिमा तोशी व सहकारी | ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील उपक्रम बघणे, समजून घेणे. |



## ९.५ प्रासंगिक :

१) मा. प्राचार्य यांनी दि. २०,२१ नोव्हेंबर रोजी लखनौ येथे सी.बी.एस.ई. तर्फे आयोजित 'मुख्याध्यापकांच्या परिषदेत' भाग घेतला.

२) श्री. माधव किल्लेदार यांनी इ. ८वी, ९वीच्या वर्गासमोर इस्रायल देशाच्या इतिहासावर आधारित 'उदयास्त' या एकांकिकेचे सादरीकरण केले.

३) इ. ५वी ते ८वीच्या गटासाठी 'व्हायोलिन वादनाचा' कार्यक्रम झाला. यात पं. अतुलकुमार उपाध्ये, श्री. तेजस उपाध्ये, श्री. अजय पराड व श्री. अतुल कांबळे यांनी सादरीकरण केले.

४) इ. ५वी ते ७वी साठी 'सनईचौघडा वादनाचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

५) 'विवेकमुद्रा' हे विवेकानंदाच्या जीवनातील प्रसंगावर आधारित रंगावलीचे प्रदर्शन उपासना मंदिरात आयोजित करण्यात आले होते.

६) प्रज्ञामानस विभागातर्फे मुलांसाठी कार्यशाळा : इ. ६वी साठी स्कूल काउंसिलिंग कोर्स अंतर्गत प्रज्ञा मानस विभागातील आठ विद्यार्थिनींनी सामाजिक जाणीव व सहकार्य या मूल्यांविषयीची आठ दिवसांची कार्यशाळा घेतली. त्यात विविध खेळ व कृतीसत्रे घेतली.

७) हस्ताक्षर वर्ग : इयत्ता ५वी ते ७वी साठी प्रत्येकी एक महिना असे हस्ताक्षराचे प्रशिक्षण वर्ग घेतले गेले. श्री. शैलेश जोशी ह्यांनी हे वर्ग घेतले. मंगळवार, दि.२२ जानेवारी रोजी जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त इ.५ वी ते ७ वी या वर्गांसाठी 'सुंदर हस्ताक्षर स्पर्धा' घेण्यात आली.

८) दि. १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिनानिमित्त' प्रा. अश्विनी जोशी यांनी ग.दि. माडगूळकर व पु.ल. देशपांडे यांच्या लेखनाविषयी इ. ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांना माहिती दिली व पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले.

९) दि. १३ डिसेंबर रोजी इ. ५वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या आदेशाप्रमाणे गोवर-रुबेलाचे लसीकरण करण्यात आले.


१०) दि. १५ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी रस्त्यांवरील सुरक्षित वाहतूक याविषयी प्रबोधन घेण्यात आले.

११) अटल टिंकरिंग लॅब : भारत सरकारच्या नीती आयोगाने मुलांच्या कल्पनाशक्तीत वाढ व्हावी आणि उद्योजकता वाढीस लागावी म्हणून विविध तंत्रज्ञानांची ओळख करून देणारी अटल टिंकरिंग लॅब ही योजना चालू केली आहे. विविध निकषांची पूर्ती करणाऱ्या ठराविक शाळांना सरकार ही प्रयोगशाळा उभारण्यासाठी सुमारे २० लक्ष रुपये अनुदान देते. पहिल्या वर्षी १०+२ लक्ष रुपये प्रयोगशाळा उभी करण्यासाठी मिळतात व उर्वरित ८ लक्ष प्रत्येक वर्षी २ या प्रमाणे देखभालीसाठी दिले जातात. नुकत्याच जाहीर झालेल्या यादीनुसार (एकूण शाळा ३४३७) ज्ञान प्रबोधिनी प्रशालेला अटल टिंकरींग लॅब उभारण्यासाठी मान्यता मिळाली आहे.

# कृतज्ञता

## २०१८-२०१९ या वर्षात देणगी देणारे हितचिंतक

| | | |
|---|---|---|
| १) | सारंग खरे | २८००१०/- |
| २) | विनायक देसूरकर | २०००००/- |
| ३) | इन्स्टि. ऑफ टॉक्सी. स्टडीज | १३५०००/- |
| ४) | अरविंद परांजपे | १०००००/- |
| ५) | आनंद राव | १०००००/- |
| ६) | किशोर पाटील | १०००००/- |
| ७) | सलील गोरे | १०००००/- |
| ८) | मोहनराव गुजराथी | १०००००/- |
| ९) | नितीन राजहंस | ५००००/- |
| १०) | नितीन राजहंस | ५००००/- |
| ११) | श्रीकांत कुलकर्णी | ५००००/- |
| १२) | प्रबोध तेरेदेसाई | ५००००/- |
| १३) | मंगेश परांजपे | ५००००/- |
| १४) | श्रीकृष्ण पटवर्धन | ५००००/- |
| १५) | स्वानंद पळणीटकर | ५००००/- |
| १६) | दीपक चक्रदेव | ५००००/- |
| १७) | अनुप साबळे | ५००००/- |
| १८) | अरुण फाटक | ५००००/- |
| १९) | डॉ. मृण्मयी साठे | ४५०००/- |
| २०) | जयश्री कूर्तकोटी | ४५०००/- |
| २१) | चिन्मय पंडित | ३००००/- |
| २२) | हेमंत मोकाशी | २५०००/- |
| २३) | हेमंत मोकाशी | २५०००/- |
| २४) | हेमंत मोकाशी | २५०००/- |
| २५) | केदार लागू | २५०००/- |
| २६) | हर्षद नेमाडे | २५०००/- |
| २७) | असित अरगडे | २५०००/- |
| २८) | गिरीश देव | २५०००/- |
| २९) | सुलोचना नातू ट्रस्ट | २५०००/- |
| ३०) | मंदार चंद्रचुड | २५०००/- |
| ३१) | दिलीप गुरूजी | २५०००/- |
| ३२) | अमोल सुगंधी | २००००/- |
| ३३) | मिलिंद नाईक | १७२०३/- |
| ३४) | मिलिंद साठे | १५०००/- |
| ३५) | स्वाती कारपूर | १२०००/- |
| ३६) | भालचंद्र सात्विक | ११०००/- |
| ३७) | आनंद फौजदार | १००००/- |
| ३८) | अविनाश जोशी | १००००/- |
| ३९) | अमित विसाळ | १००००/- |
| ४०) | मंदार नातू | १००००/- |
| ४१) | अमित वझे | १००००/- |
| ४२) | दिगंबर दाभाडे | १००००/- |
| ४३) | सुधा मोने | १००००/- |
| ४४) | अशोक विद्यालय | ६०००/- |
| ४५) | इंद्राणी गाडगीळ | ५००१/- |
| ४६) | रणजित देशमुख | ५०००/- |
| ४७) | अविनाश बर्वे | ५०००/- |
| ४८) | नितिन जठार | ५०००/- |
| ४९) | हरीश सरोदे | ५०००/- |
| ५०) | अचला फडके | ५०००/- |
| ५१) | श्रीकांत लिमये | ५०००/- |
| ५२) | प्रशांत बनकर | ५०००/- |
| ५३) | अमोद रहातेकर | ५०००/- |
| ५४) | विनायक कुलकर्णी | ३०००/- |
| ५५) | प्रत्युमा कामत | ३०००/- |
| ५६) | स्मिता बर्वे | २०००/- |
| ५७) | रेणुका नवरे | २०००/- |
| ५८) | मोरेश्वर बर्वे | २०००/- |
| ५९) | चेतन एरंडे | १५००/- |
| ६०) | अभिजित गुर्जर | १५००/- |
| ६१) | रामेश्वर पवार | १५००/- |
| ६२) | नीरजा सोनावणे | १५००/- |
| ६३) | अभिजित गुर्जर | १२००/- |
| ६४) | रजत जोशी | १०००/- |
| ६५) | रजत जोशी | १०००/- |
| ६६) | रजत जोशी | १०००/- |
| ६७) | दिपाली धाडवे | १०००/- |
| ६८) | निनाद दामले | १०००/- |
| ६९) | शिवानी कामदी | ७००/- |
| ७०) | मराठी विज्ञान परिषद | ६००/- |
| ७१) | डॉली छाबडा | ५२०/- |
| ७२) | डॉली छाबडा | ४२०/- |
| ७३) | सर्जनशील पालक समूह | ३००/- |
| ७४) | अरुण फाटक | ५१/- |



स्वयंअध्ययन कौशल्ये
वाचन कौशल्ये
स्मरण कौशल्ये
विचार कौशल्ये
संवाद कौशल्ये
यांचे
शालेय व सहशालेय
उपक्रमांमधून प्रशिक्षण

## बौद्धिक प्रगल्भता

नियोजन कौशल्य
निर्णय कौशल्य
व्यवस्थापन कौशल्य
संघटन कौशल्य
यांचे गट-बैठकी,
पथक पद्धती,
अग्रणी योजना,
विस्तार कार्य,
मार्गदर्शक दले इ.
द्वारे प्रशिक्षण

## नेतृत्वगुण विकास

प्रकल्प भेटी
संस्था भेटी
अभ्यास दौरे
विस्तार कार्य
ग्रामीण शिबिरे
नागरी वस्ती-संस्कारवर्ग
गणेशोत्सव
मदत कार्य

## सामाजिक जाणीव

चरित्रकथन, कथाकथन
इतिहास कथन, पद्ये-अभंग,
उपासना, प्रतिज्ञा-ग्रहण, बैठकी
विशेषदिन, जोडीकार्ये, गटकार्ये,
ग्रंथालय, वैचारिक कार्यक्रम,
अभिव्यक्ति विकसन,
छात्र प्रबोधन मासिक

## मानसिक समृद्धी

देह परिचय
दैनंदिन खेळ
व्यायाम, संचलन
स्पर्धा व सामने
क्रीडा शिबिरे
क्रीडा प्रात्यक्षिके
हस्तकौशल्ये
गिर्यारोहण तालनृत्य

## शारीरिक कौशल्ये

# शैक्षणिक उपक्रम



